POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

● वर्ष-०५ ● अंक-६० ● मुंबई, गुरुवार, ०२ ऑक्टोबर २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## 'उद्धव ठाकरेंच्या दसरा मेळाव्याला ६३ कोटींचा खर्च! मेळावा रद्द करुन पैसा पूरग्रस्त शेतकऱ्यांना द्या, हवं तर...'

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

राज्याचे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंनी पीएम केअर्सच्या खात्यावरील निधीचा पूरग्रस्तांच्या मदतीसाठी वापर करावा अशी मागणी राज्य आणि केंद्र सरकाकडे केलेली असतानाच आता महाराष्ट्र भारतीय जनता पार्टीने थेट ठाकरेंच्या दसरा मेळाव्याच्या खर्चाचा कथित आकडा जाहीर करत त्यांना हा खर्च टाळण्याची मागणी केली आहे. खोचक शब्दांमध्ये ठाकरेंनी मेळावा घेण्याऐवजी ही रक्कम दुष्काळग्रस्तांना द्यावी असंही भाजपाने म्हटलं आहे.




### अत्यंत खात्रीलायक माहिती

'63 कोटीचा दसरा मेळावा' या मथळ्याखाली पोस्ट करताना, ''नऊ हा 'आकडा' लाभदायक असल्याचे कुणीतरी सांगितल्यापासून उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे सगळे व्यवहार या आकड्यांवर अवलंबून असतात. निवडणुकीतील उमेदवारांच्या संख्येची बेरीज नऊ हवी, टक्केवारी नऊपेक्षा कमी नसावी, इतकेच काय, दोघा भावांमध्ये असलेल्या ३६ च्या आकड्याची बेरीजही नऊ असावी याची नेहमीच काळजी घेणाऱ्या या गटाचा दसरा मेळाव्याचे नियोजनही ६३ कोटींच्या घरात असणार आहे. गटाच्या गोटातील सूत्रांनी दिलेली ही अत्यंत खात्रीलायक माहिती,'' असं महाराष्ट्र भाजपाचे प्रवक्ते केशव उपाध्येंनी म्हटलं आहे.

### या ६३ कोटींमध्ये अतीवृष्टीच्या संकटात...

''मेळाव्यासाठी तब्बल ६३ कोटीचे नियोजन झाल्याचे या गटातील नेत्यानेच हर्षोल्हासित होत सांगितले. सभा ठिकाण, स्टेज सजावट, जाहिराती, सोशल मिडीया, त्याशिवाय लोकांना आणायला गाड्या, गाडीत बसून लोकांनी मेळाव्याला यावे म्हणून, शिवाय त्यांच्या वडापाव, चहापाण्याची व्यवस्था... असं सगळं मिळून हे ६३ कोटी लागणार आहेत म्हणे. या ६३ कोटींमध्ये अतीवृष्टीच्या संकटात सापडलेल्या मराठवाड्यात किती गावातील शेतकऱ्यांना मदत झाली असती? किती घरे वसवली गेली असती?'' असा सवाल उपाध्येंनी उपस्थित केला आहे.

### चिन्ह चोरलं ही रडगाणी ऐकायला...

''शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे असताना लोक स्वतःहून उत्साहात यायचे. तेव्हा सेना प्रमुखाचं विचारांच सोनं असायच. आता तशी परिस्थिती नाही! मागचे काही मेळावे आठवा... मिंधे, खंजीर, माझा पक्ष चोरला, चिन्ह चोरलं ही रडगाणी ऐकायला एकट्या गटातून गर्दी पण गोळा होत नाही म्हणून ३६ चा आकडा मोडून ६३ ची गोळाबेरीज करण्याचा हा आटापीटा!! नाकी नऊ आले म्हणतात ते हेच,'' असा टोला उपाध्येंनी लगावला आहे.

### हवं तर उद्धव ठाकरेंच्या नावाने...

पोस्टच्या शेवटी, ''रडगाण्याचे तेच बेसूर सूर आळवायला खरंच ६३ कोटीचा मेळावा घ्यायची गरज आहे का? हवं तर उद्धव ठाकरेंच्या नावाने मराठवाड्यात मदत करा पण हे ६३ कोटी महाराष्ट्राच्याच उभारणीत लावा,'' असा सल्ला भाजपाच्या प्रवक्त्यांनी दिला आहे.

**दोन दिवसांपूर्वीच म्हणालेले, 'प्रायश्चित्त घेण्याची वेळ...'**

दोन दिवसांपूर्वीच म्हणजे २९ सप्टेंबर रोजी केशव उपाध्येंनी, ₹मराठवाड्यातील पूरपरिस्थिती भयंकर आहे. लोकांच सगळं उध्वस्त झालं आहे. त्याबद्दल उध्दव ठाकरे यांनी पाच जिल्ह्यात तब्बल तीन तासांचा दौरा करून दुःख, वेदना, व्यथा व्यक्त केली आहे. त्यांच्या या भावना पाहून सगळेच अस्वस्थ झाले आहेत. उद्धवराव,आता वेळ आहे कृती करायची... मुख्यमंत्री असताना तर कधी कृती न करता घरात बसून राहिलात, आता त्याचे प्रायश्चित्त घेण्याची वेळ आली आहे. दसरा मेळावा रद्द करून तो खर्च पूरग्रस्ताना दिला पाहिजे. तर त्यांच्या व्यथा आणि वेदनांवर संवेदना व्यक्त करायला अर्थ असेल. शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे असताना या दसरा मेळाव्यात विचारांचे सोने लुटले जायचे, आता तिथे येऊन मिंधे, गद्दार, माझा पक्ष चोरला एवढीच टेप वाजवणार, नुसताच थयथयाट अन् कांगावा... त्यासाठी बिचाऱ्या सामान्य कार्यकत्यार्ला भुर्दंड पाडून लाखोंचा खर्च कशाला करायचा? ते रडगाणं तर सामनातून चालूच असतं की,₹ असा खोचक सल्ला दिलेला.





## राज ठाकरेंकडून पूरग्रस्तांना कोणी विचारही करणार नाही अशी मदत! अन्नधान्य, कपडे नाही तर...

■मुंबई। प्रतिनिधी,

महाराष्ट्रात अतिवृष्टीने जो धुमाकूळ घातला त्यानंतर पूरग्रस्तांना प्रशासनाने आता एकरी किमान ३० ते ४० हजाराची मदत घोषित करावी आणि शेतकरी आणि त्याचं कुटुंब पुन्हा उभं राहील हे पहावं, अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरेंनी २४ सप्टेंबर रोजी सोशल मीडियावरुन केलेल्या पोस्टमधून केली होती. राज्य सरकारने शेतकऱ्यांना पुढल्या आठवड्यापासून विशेष मदत केली जाईल अशी माहिती स्वतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना दिली. असं असतानाच आता राज ठाकरेंनी एक अत्यंत आगळा वेगळा आणि महत्त्वाचा निर्णय घेतला असून पूरग्रस्त भागातील शेतकऱ्यांना अनोख्या पद्धतीने मदत करण्याचा निर्णय घेतला असून कामालाही सुरुवात झाली आहे.

### तुटपुंज्या नुकसान भरपाईने काहीही होणार नाही

''आमच्या पक्षाच्या पदाधिकाऱ्यांशी बोलल्यावर, लक्षात आलं आहे की, कित्येक ठिकाणी जमीन पूर्णपणे खरवडून वाहून गेलेली आहे. मे महिन्याच्या मध्यात जो पाऊस सुरु झाला आहे, त्याने जवळजवळ उघडीप घेतलीच नाहीये त्यामुळे, शेतीचं अतोनात नुकसान झालं आहे. ग्रामीण महाराष्ट्राची अर्थव्यवस्था पूर्णपणे उध्वस्त झाली आहे,'' असा उल्लेख राज ठाकरेंनी आपल्या पोस्टमध्ये केलेला. तसेच,



''कुठल्याही निकषांच्या चौकटीत न लावता, सरसकट ओला दुष्काळ जाहीर करा. एकरी ७ आणि ९ हजार रुपये इतक्या तुटपुंजी नुकसान भरपाईने काहीही होणार नाही. त्याऐवजी एकरी किमान ३० हजार रुपये नुकसान भरपाई घोषित करा. कारण आता शेतकऱ्याची घडी बसायला किमान एक वर्ष लागेल,'' असंही राज यांनी म्हटलं होतं. राज ठाकरेंना दूरदृष्टी असलेला नेता म्हणून पाहिलं जातं. त्यांनी पुढील वर्षभराचा विचार करुन मांडलेलं हे मत योग्यच असल्याचं अनेकांनी म्हटलं. आता हीच दूरदृष्टी वापरुन राज ठाकरेंनी अनोख्या पद्धतीने मदत करण्याचं ठरवलं असून काम सुरु केलं आहे.

### ...म्हणून पुरवणार आवश्यक साहित्य

राज ठाकरे यांनी पक्षाच्यावतीने नुकसानग्रस्त गावांची पाहणी करून तेथील शेतकऱ्यांना मदत करण्याचे आदेश पदाधिकाऱ्यांना दिले आहेत, अशी माहिती सूत्रांनी दिली. तसेच पुरामुळे शेतांमध्ये पाणी शिरून उभ्या पिकांचे नुकसान झाले आहे. शेतकरी आधीच कर्जबाजारी आहे. सरकारी मदत त्यांच्या उपयोगी पडणार नाही. पुन्हा कर्ज काढावे लागणे टाळण्यासाठी त्यांना शेतीसाठी लागणारे आवश्यक साहित्य पुरवणार आहे.

**मनसे नेमकी काय मदत करणार**

पूरग्रस्त शेतकऱ्यांना मनसे नवसंजीवनी देणार असून ही संकल्पना राज ठाकरेंनी सुचवल्याचं सांगितलं जात आहे. राज्यात अतिवृष्टीमुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी मनसे अध्यक्ष राज ठाकरे पुढे सरसावले आहेत. पूरग्रस्त शेतकऱ्यांना अन्नधान्य, कपडे व जीवनावश्यक वस्तूंचे वाटप सुरू असताना, मनसेकडून मात्र थेट शेतीसाठी आवश्यक बी-बियाणे, खते व अवजारे मदत म्हणून देण्यात येणार आहेत.

### एक हजार शेतकऱ्यांना मदत

सध्या प्राथमिक पातळीवर एक हजार शेतकऱ्यांना मदत दिली आहे. पदाधिकाऱ्यांकडून आलेल्या माहितीनंतर किती गावांना व शेतकऱ्यांना मदत करायची याचा निर्णय घेतला जाईल. दिवाळीपर्यंत शेतकऱ्यांना या वस्तू मिळतील असा पक्षाचा प्रयत्न आहे, असे त्यांनी सांगितले.

## २ दिवस आधीच शिंदेंच्या दसरा मेळाव्याचं ठिकाण बदललं




■मुंबई । प्रतिनिधी,

शिवसेनेतील बंडखोरीनंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी देखील शिवसेनेच्या दसरा मेळाव्याची परंपरा कायम ठेवली आहे. बाळासाहेब ठाकरे आणि दिवंगत आनंद दिघे यांच्या विचाराने चालणाऱ्या एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचा दसरा मेळावा कुठे होणार याची उत्सुकता प्रत्येकाला लागली होती. शिवसेनेचा दसरा मेळावा आझाद मैदानात होणार असल्याचे समोर आले होते. मात्र दररोज पाऊस पडत असल्यामुळे आझाद मैदानात चिखल आणि पाणी साचले आहे. त्यामुळे यंदाचा शिवसेनेचा दसरा मेळावा आझाद मैदानाऐवजी गोरेगावच्या नेस्को सेंटरमध्ये होणार आहे, अशी माहिती एकनाथ शिंदे यांनी दिली.

पत्रकार परिषदेत बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले की, विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्रासह ज्या-ज्या भागात पूरस्थिती आहे, त्या भागातील कार्यकर्त्यांना दसरा मेळाव्यासाठी मुंबईमध्ये न बोलवता त्यांना आमचं एवढंच सांगणं आहे की, शेतकऱ्यांना मदत करा. शेतकऱ्यांच्या बांधावर जा, शेतकऱ्यांच्या घरात जाऊन त्यांना मदत करा. पूरस्थितीमध्ये अडकलेल्यांचा देखील दसरा हा सण आहे, त्यामुळे त्यांना जे-जे काही आवश्यक आहे, त्यांना मदतीचा हात देण्याचा काम करा. त्या भागातील सर्व कार्यकर्त्यांना, पदाधिकाऱ्यांना आणि मंत्र्यांना आवाहन करतो की, पूरस्थितीमध्ये जे संकटात सापडले आहेत, त्यांचे अश्रू पुसण्याचं काम करा. कुठल्याही परिस्थितीमध्ये तिथली जी यंत्रणा ती काम करेल आणि संकटात सापडलेल्यांचा दसरा व दिवाळी चांगला करण्याचा प्रयत्न करतील, असे त्यांनी सांगितले.

आमची जी परंपरा आहे, ती खंडीत होता कामा नये. बाळासाहेब ठाकरे यांनी सुरू केलेली दसरा मेळाव्याची परंपरा सुरू राहावी, यासाठी यंदाचा दसरा मेळावा गोरेगावच्या नेस्को सेंटरमध्ये होणार आहे. केवळ एमएमआर क्षेत्रातील शिवसैनिकांसाठी नेस्को येथे हा दसरा मेळावा होणार आहे. दसरा मेळाव्यातून शेतकरी आणि पूरग्रस्तांसाठी शिवसेनेकडून निधी संकलित करण्यात येणार आहे. या मेळाव्यात राज्यभरातील पदाधिकारी आणि शिवसैनिक हजर राहणार नाहीत. हे सर्व पदाधिकारी पूरग्रस्त भागात मदत करणार आहेत, असा पुनरुच्चार एकनाथ शिंदे यांनी केला.

## टिळा-टिकली लावल्यास थेट शिक्षा, कल्याणमधील 'गांधी' शाळेचा अजब फतवा... पालकांचा संताप, ठाकरे सेनेने विचारला जाब

**कल्याणच्या शाळेचा अजब फतवा**

शाळेत विद्यार्थ्यांना टिळा-टिकली आणि हातात धागे बांधण्यास शाळेने बंदी घातली. जर कोणी टिळा, टिकली अथवा हातात धागा घालून आले तर त्याला शिक्षा देण्यात येईल असा फतवा कल्याणमधील श्रीमती कांताबेन शांतीलाल गांधी स्कूलने काढला. त्यामुळे पालक संतप्त झाले. त्यांनी या शाळेची तक्रार थेट कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेकडे केली.

■कल्याण । प्रतिनिधी,

कल्याणमधील श्रीमती कांताबेन शांतीलाल गांधी शाळा वादात अडकली आहे. धार्मिक सहिष्णुता जपण्याच्या नावाखाली ही शाळा हिंदूच्या धार्मिक आस्था दुखावत असल्याचे समोर आले. विद्यार्थ्यांनी टिळा,टिकली लावल्यास अथवा हातात धागा, बांगडी घातल्यास त्यांना शिक्षा देण्यास येईल असा अजब फतवा या शाळेने काढला. त्याविरोधात पालकांचा संताप अनावर झाला. त्यांनी कल्याण डोंबिवली महानगरपालिकेकडे तक्रार दिली. तर या प्रकाराविरोधात उद्धव सेना सुद्धा आक्रमक झाली. त्यांनी व्यवस्थापनासह मुख्यध्यापकांना धारेवर धरले. यावेळी मोठा तणाव झाला. पोलिसांचा बंदोबस्त मागवण्यात आला.

हा अजब फतवा काढल्यानंतर वातावरण तापले. प्रकरण अंगावर शेकत असल्याचे दिसताच या शाळेच्या व्यवस्थापनाने मग साळसूद भूमिका घेतली. त्यांनी असा




काही प्रकार केला नसल्याची भूमिका घेतली. घाबरलेल्या व्यवस्थापनाने मग आपल्या भूमिकेवर पांघरूण घालण्याचा प्रयत्न केला. आम्ही कुठला फतवा काढला नाही. शाळेत धार्मिक तेढ निर्माण होऊ नये यासाठी फक्त सूचना दिल्या असा कांगावा या शाळेने केला. पण यातून शाळा प्रशासनाने फतवा काढल्याचे मान्य केले.

कडा व बांगडीने इजा होऊ नये यासाठी आम्ही ते बंद केलेले आहे त्याचबरोबर टिळा धागे यामुळे शाळेत धार्मिक वाद होत असल्याने त्यादेखील काढाव्या अशा सूचना पालकांना दिल्याचे शाळेचे म्हणणे आहे. शाळेचे सिक्रेटरी मनोहर पालन, स्वप्नाली रानडे रानडे शाळा डायरेक्ट आणि मुख्याध्यापक संजय पाटील यांनी त्यांची बाजू मांडली.

दरम्यान हा प्रकार समजताच उद्धव ठाकरे गटाने शाळेत धाव घेत व्यवस्थापनाला जाब विचारला. शाळा प्रशासनाचे संचालक मुख्याध्यापक आणि ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांची बैठक झाली. बैठकीत ठाकरे गटा आक्रमक झाला. आम्ही इतर धमार्ला सांगतो का टिळा किंवा टिकली लावा. त्यांच्यासाठी आमच्या धर्मावर बंदी का? असा थेट सवाल त्यांनी विचारला. आम्ही सर्व धमार्चा आदर करतो असे म्हणत ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांनी गोंधळ घातला. बैठकीत ठाकरे गटाचे कार्यकर्ते आणि शाळेचे संचालक,मुख्याध्यापक, शिक्षक उपस्थित होते. तर यावेळी कुठलाही अनुचित प्रकार होऊ नये यासाठी पोलिसांचा तगडा बंदोबस्त दिसून आला.

## कुठे रास्ता रोको, कुठे चक्काजाम, एसटी आरक्षणासाठी धनगर समाजाचे राज्यभर आंदोलन!

■मुंबई । प्रतिनिधी,

राज्यात मराठा आरक्षणाचा मुद्दा पेटल्यानंतर आता धनगर समाजाच्या आरक्षणाचाही मुद्दा चांगलाच तापला आहे. आम्हाला एसटी प्रवगार्तून आरक्षण द्यावे, अशी मागणी धनगर समाजाकडून करण्यात येत आहे. याच मागणीला घेऊन राज्यभरात आंदोलन, निदर्शने केली जात आहेत. काही ठिकाणी रास्ता-रोकोदेखील केला जात आहे. दरम्यान, धनगर समाजाच्या या मागणीचा वणवा समस्त राज्यात पेटला आहे. त्यामुळे आता सरकारवर एका प्रकारे दबाव वाढताना दिसतोय. परभणी, जालना, सोलापूर, जळगाव अशा अनेक जिल्ह्यात आंदोलनाचे हे लोण पसरलेले आहे.



### जळगावमध्ये धनगर समाज आक्रमक

जळगाव जिल्ह्यातील रावेरमध्ये धनगर समाज आरक्षणाच्या मागणीसाठी आक्रमक झाला आहे. रावेरमध्ये ओंकारेश्वर-बऱ्हाणपूर महामार्गावर चक्काजाम करण्यात आला आहे. या आंदोलनामुळे वाहतुकीच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत. धनगर समाज रस्त्यावर उतरून मोठ्या प्रमाणात घोषणाबाजी करत असून तासापासून चक्काजाम सुरू आहे. दुसरीकडे रावेरचे आमदार अमोल जावळे यांच्या निवासस्थानावर धनगर समाजाने ढोल बजाव आंदोलन करून निवेदन दिले आहे.

### परभणीतही चक्काजाम आंदोलन

एसटी प्रवर्गात समाविष्ट करण्याच्या मागणीसाठी परभणीत धनगर समाज रस्त्यावर उतरला असून, जिल्ह्यात अनेक ठिकाणी धनगर समाजकडून आज चक्काजाम आंदोलन करण्यात आले. धनगर समाजाकडून परभणी-गंगाखेड रस्ता अडवण्यात आला. या आंदोलनामुळे वाहनांच्या लांब रांगा लागल्या होत्या. त्यामुळे वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली होती. या आंदोलनासाठी धनगर समाज मोठ्या संख्येने जमला होता.

### जालन्यात आंदोलन, वाहतूक ठप्प

जळगावात जिल्ह्यातील आकाशवाणी चौकात राष्ट्रीय महामार्गावर धनगर समाजाच्या वतीने रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. धनगर समाजाच्या वतीने मानवी साखळी करून मुंबई-नागपूर महामार्ग तब्बल पाऊण तास रोखून धरण्यात आला. आरक्षणाच्या मागणीसाठी जळगाव शहरासह जिल्ह्यात वेगवेगळ्या तालुक्यांमध्ये धनगर समाजाच्या वतीने हे आंदोलन करण्यात आले. रास्ता रोको आंदोलनामुळे महामार्गावरील दोन्ही बाजूची वाहतूक ठप्प होती. यामुळे एक ते दोन किलोमीटर पर्यंत वाहनाच्या रांगा लागल्या होत्या. आंदोलनात या आंदोलनात महिलांचादेखील सहभाग होता. कोणत्याही समाजाला आरक्षण देण्यात आम्हाला आक्षेप नाही. मात्र आम्हालाही आरक्षण द्यावे अशी मागणी यावेळी करण्यात आली. या आंदोलनाच्या माध्यमातून जालना येथे सुरू असलेल्या दीपक बोराडे यांच्या अमर उपोषणालादेखील पाठिंबा देण्यात आला.

### सोरापुरातील करमाळ्यात रास्ता रोको

सोलापूर जिल्ह्यातील करमाळा येथे सकल धनगर समाजाच्या वतीने रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. अहिल्यानगर ते टेंभुर्णी महामार्गावरील करमाळ्यातील मौलाली माळ येथे रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. यावेळी ढोल वाजवत धनगर समाजाकडून करमाळ्यात रस्ता अडवण्यात आला. धनगर समाजाला रळ आरक्षण मिळावे म्हणून दीपक बोराडे यांचे पंधरा दिवसांपासून उपोषण सुरू असून सरकार याकडे लक्ष देत नसल्याने सकल धनगर समाजाच्या वतीने हे आंदोलन करण्यात आले. आरक्षण आमच्या हक्काचे, नाही कुणाच्या बापाचे, येळकोट येळकोट जय मल्हार अशी घोषणाबाजी यावेळी करण्यात आली.



संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# मराठी माणसाच्या आत्मसन्मानाचा आवाज

''शिवतीर्थावरील दसरा मेळावा'' ही ठाकरेंची प्रबोधनाची परंपरा गेली ५९ वर्षे अव्याहतपणे सुरू आहे आणि ठाकरेंचे हे प्रबोधन असेच भविष्यातही महाराष्ट्राला आणि देशाला दिशा दाखवत राहील, याबाबत सर्वसामान्यांना खात्री आहे. महाराष्ट्राच्या राजकीय परंपरेत काही विशिष्ट सोहळे केवळ पक्षीय कार्यक्रम म्हणून न राहता समाजजीवनावर छाप उमटवतात. त्यापैकी शिवसेनेचा शिवतीर्थावरील दसरा मेळावा हा सर्वांत महत्त्वाचा. १९६६ मध्ये बाळासाहेब ठाकरे यांनी आरंभ केलेला हा मेळावा २०२५ पर्यंत सलगपणे पार पडत आला असून, याच व्यासपीठावरून महाराष्ट्राच्या राजकीय दिशा आणि प्रवाह निश्चित झालेले दिसतात. ''जमलेल्या माझ्या तमाम हिंदू बांधवांनो, भगिनींनो आणि मातांनो...'' या गर्जनेने सुरू होणारे ठाकरेंचे भाषण हे लाखो हिंदुस्थानी मनाचा ठाव घेत आले आहे. ठाकरेंची ही प्रबोधनाची परंपरा गेली ५९ वर्षे अव्याहतपणे सुरू आहे आणि ठाकरेंचे हे प्रबोधन असेच भविष्यातही महाराष्ट्राला आणि देशाला दिशा दाखवत राहील, याबाबत सर्वसामान्यांना खात्री आहे. शिवसेनेचा पहिला दसरा मेळावा हा ३० ऑक्टोबर १९६६ रोजी मुंबईतील शिवाजी पार्क (शिवतीर्थ) मैदानावर भरला होता. तो दिवस आणि तो मेळावा शिवसेना तसेच महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासात खूप महत्त्वाचा ठरला. १९ जून १९६६ रोजी बाळासाहेब ठाकरे यांनी शिवसेना स्थापन केली आणि त्यानंतर फक्त चार महिन्यांत पहिला दसरा मेळावा भरवण्यात आला. व्यासपीठावरून बाळासाहेबांनी आपले वडील प्रबोधनकार ठाकरे यांच्या लढाऊ विचारांना उजाळा दिला. ''मराठी माणसाने उभं रहायला हवं, स्वतःच्या हक्कासाठी लढायला हवं'' हा संदेश त्यांनी दिला. त्या पहिल्या मेळाव्यात बाळासाहेबांनी ''मुंबईत मराठी माणसाला नोकरी मिळाली पाहिजे'' हा मुद्दा सर्वांत ठळकपणे मांडला. यामुळेच पुढे शिवसेनेचा ''मराठी माणसाचा हक्क'' हा मुख्य धागा ठरला. बाळासाहेब ठाकरे यांचे व्यंग, कार्टूनधर्मी मांडणी, थेट भाष्य करणारी शैली या पहिल्याच मेळाव्यात प्रकट झाली. त्यांच्या उपरोधिक वाक्यांनी आणि थेट टोमण्यांनी श्रोत्यांवर छाप पाडली. हजारोंच्या संख्येने लोक शिवतीर्थावर जमले होते. मुंबईत मराठी माणसाचे स्थान आणि भविष्य याबाबतची अस्वस्थता त्या गर्दीतून स्पष्ट दिसत होती. या पहिल्या मेळाव्यामुळे शिवसेनेच्या राजकीय प्रवासाची औपचारिक सुरुवात झाली. 'दसरा मेळावा म्हणजे ठाकरेंच्या शिवसेनेचे शक्तीप्रदर्शन' ही परंपरा त्याच दिवशी निर्माण झाली. हा फक्त पक्षाचा मेळावा नव्हता, तर मराठी माणसाच्या आत्मसन्मानाचा आवाज होता. पुढे महाराष्ट्राच्या राजकारणात शिवसेनेला जे महत्त्वाचे स्थान मिळाले त्याची बीजे इथे रोवली गेली. हा पहिला मेळावा म्हणजे एका नव्या राजकीय शक्तीचा जन्म होता. बाळासाहेबांच्या विचारांची, नेतृत्वशैलीची आणि मराठी अस्मितेच्या आंदोलनाची ही सुरुवात होती. पहिल्या मेळाव्याने मराठी युवकांना रोजगार आणि न्याय मिळावा, मुंबई ही महाराष्ट्राचीच राजधानी राहावी, अशा ठाम मागण्यांचा आवाज दिला. ७०-८०च्या दशकात या व्यासपीठावरून काँग्रेस, डावे विचार व बाहेरून आलेल्या मजुरांविरोधात रोखठोक भाष्य झाले. ''मराठी माणूस'' हा त्याकाळचा केंद्रबिंदू ठरला. १९९०नंतर शिवसेना-भाजप युती तसेच राममंदिर आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर दसरा मेळावा राष्ट्रीय स्तरावर झळकला. ''गर्वसे कहो हम हिंदू है'' हा घोष या व्यासपीठावरून दुमदुमला. १९९५मध्ये युती सरकार स्थापल्यानंतर हा मेळावा सत्ता आणि जबाबदारी यांचा अहवाल देणारा कार्यक्रम ठरला. शेवटच्या दशकात बाळासाहेबांची तब्येत ढासळली. तरीही भ्रष्टाचारविरोधी इशारे, मत न विकण्याचा आदेश आणि हिंदुत्वाशी प्रामाणिक राहण्याचा आग्रह त्यांनी व्यक्त केला. २०१२ मध्ये बाळासाहेबांचा काळाच्या पडद्याआड जाण्यापूर्वीचा अखेरचा मेळावा भावनिक ठरला; रेकॉर्डेड संदेशातून 'उद्धव आणि आदित्यची काळजी घ्या' अशी हाक देत त्यांनी एक युग संपवले. दसरा मेळाव्याची परंपरा आणि बाळासाहेब ठाकरे यांचा वैचारिक वारसा खऱ्या अर्थाने पुढे चालवला आणि अव्याहतपणे पुढे नेत असंख्य संकटांवर मात करत संघर्षरत ठेवला तो उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी. उद्धव ठाकरे यांनीच खऱ्या अर्थाने बाळासाहेबांच्या विचारांचा वारसा पुढे चालवला. उद्धव ठाकरे यांनी भाषणाची आक्रमक शैली बदलून विचारपूर्वक आणि सौम्य, पण ठाम पद्धतीने विरोधकांना आवाज दिला आणि शिवसैनिकांना शिवसेनेचा वैचारिक वारसा आपल्याकडेच आहे हे दाखवून दिले. शेतकऱ्यांची कर्जमाफी, स्वस्त जेवण योजना, वीजमाफी अशी जनकल्याणकारी आश्वासने, तसेच भाजपच्या हिंदुत्वाच्या मक्तेदारीवर प्रखर टीका हे त्यांच्या भाषणांचे प्रमुख मुद्दे राहिले. उद्धव ठाकरे यांच्या दसरा मेळाव्यांतील भाषणे ही केवळ राजकीय प्रहार नव्हेत, तर विचारधारेचा प्रवास आहेत. हिंदुत्वाची व्याख्या त्यांनी जपली, पण तिला सर्वसमावेशकतेची चौकट दिली. त्यामुळे आज त्यांच्या भाषणांमधून एक वेगळा संदेश घुमतो ''हिंदुत्व हे द्वेषाचे नाही, तर समतेचे आणि माणुसकीचे प्रतीक आहे.'' त्यांच्या भाषणांतून दोन स्पष्ट धागे दिसतात. हिंदुत्वाचे सातत्य आणि सर्वसमावेशकतेकडे झुकलेला दृष्टिकोन. २०१५ च्या मेळाव्यात उद्धव ठाकरेंनी थेट भारताला हिंदू राष्ट्र घोषित करण्याची मागणी केली आणि समान नागरी कायद्याचा मुद्दा उपस्थित केला. हे स्पष्टपणे बाळासाहेबांच्या परंपरेशी जोडलेले हिंदुत्व होते. पण याचबरोबर त्यांनी सत्ताधाऱ्यांवर टीका करताना सामान्य जनतेच्या समस्या, महागाई, रोजगार आणि शेतकऱ्यांचे प्रश्न यांना देखील अग्रक्रम दिला. यामुळे हिंदुत्वाचा विषय धार्मिक चौकटीत न अडकता सामाजिक, आर्थिक अंगानेही पुढे आला. २०१९ मध्ये त्यांनी दहा रुपयांत थाळी, आरोग्यसेवा, वीजदर कपात असे लोकजीवनाशी निगडित प्रस्ताव मांडले. यामागे विचार स्पष्ट होता - हिंदुत्व हे केवळ धार्मिक घोषणेत न राहता जनतेच्या पोटापाण्याशी जोडले पाहिजे. याच काळात त्यांनी राम मंदिराचा कायदा आणण्याची मागणीही केली, म्हणजे परंपरा आणि वर्तमानकाळातील जनहित या दोन्हीचा संगम साधण्याचा प्रयत्न होता. मुख्यमंत्री झाल्यानंतर २०२०च्या मेळाव्यात त्यांनी हिंदुत्वाची व्याख्या अधिक सर्वसमावेशक केली, ''आमचे हिंदुत्व म्हणजे केवळ घंटा बडवणारे नाही, तर हृदयात राम आणि प्रत्येक हाताला काम हा हिंदुत्वाचा मार्ग आहे.'' असे सांगत त्यांनी धार्मिक कट्टरतेपेक्षा लोककल्याणाचा आधार घेतला. याचवेळी केंद्रातील भाजप सरकारवर कठोर टीका करून त्यांनी हिंदुत्वाच्या नावाखाली होणाऱ्या राजकारणावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. २०२२मध्ये शिंदे गटाच्या बंडानंतर उद्धव यांचे भाषण अधिक धारदार झाले. ''रोजगार गुजरातला जातोय, महाराष्ट्र मागे पडतोय.'' असे सांगत त्यांनी केंद्रावर आणि भाजपवर थेट हल्ले केले. ''माझ्या पक्षाचे काय होणार?'' या प्रश्नाला त्यांनी उत्तर कामातून दिले आणि ''विश्वासघातकींचे काय होणार?'' हा प्रश्न विचारून गद्दारांच्या त्या काळातील राजकीय संकटाचे भवितव्य दाखवून दिले. त्यांच्यासाठी हिंदुत्व म्हणजे जमिनीशी, माणसांशी, समस्यांशी नाळ जोडणारी विचारसरणी. या सर्व वर्षांत उद्धव ठाकरे यांच्या दसरा मेळाव्यातील भाषणांतून एक स्पष्ट प्रवास दिसतो तो म्हणजे बाळासाहेबांच्या आक्रमक हिंदुत्वापासून सर्वसमावेशक हिंदुत्वापर्यंत. यात सातत्य आहे, कारण हिंदुत्व हा धागा कधी तुटलेला नाही. २०१९नंतरच्या राजकीय उलथापालथीत आणि शिंदे गटाच्या बंडानंतर या ठाकरे यांच्या मेळाव्याला अधिकच महत्त्व प्राप्त झाले. कोविडकाळात मेळावा व्हर्च्युअल पद्धतीने झाला. २०२२ पासून शिंदे गटाच्या बंडामुळे दोन स्वतंत्र मेळावे दिसू लागले. पण शिवतीर्थावरील परंपरा ठाकरेंचीच हे अनेकदा सिद्ध झाले. शिंदेंना कधी बीकेसी तर कधी आझाद मैदानावर धाव घ्यावी लागली. पण ठाकरेंची वैचारिक बैठक बाळासाहेबांच्या रिकाम्या खुर्चीने कशी साध्य होणार? त्यामुळे ठाकरेंची शिवसेना जरी भाजपने कटकारस्थान करून शिंदेंकडे सोपवली तरी उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी आपल्या नावाने शिवसेना पुन्हा जिवंत केली आणि घडवली वाढवली. ठाकरेंचे कर्तृत्व म्हणतात ते यालाच. म्हणूनच शिवसेना म्हटल्यावर केवळ आणि केवळ ठाकरे एवढेच नाव समोर येते आणि मराठी माणसाच्या हिंदू माणसाच्या हृदयावर ते कायमस्वरूपी कोरले गेले आहे, तसेच दसरा मेळावा म्हटले की, तो शिवतीर्थावरील ठाकरेंचाच मेळावा हे देखील अलिखित सत्याचा एक भाग झालेले आहे. शिवसेनेसमोर गेल्या ५९ वर्षांत अनेक संकटं आली आणि गेली. काळ पुढे सरकत राहिला. मात्र शिवसेना तशीच राहिली. ही परंपरा अशीच पुढे सुरू आहे आणि राहणार आहे. शिवाजी पार्क मैदानालाही जणू दरवर्षी दसरा जवळ आला की, आस लागते ती ठाकरेंच्या त्या गर्जना ऐकण्याची... जमलेल्या माज्या तमाम हिंदू बांधवांनो, भगिनींनो आणि मातांनो...हे ऐकण्याची...



# हा विरोधाभास कधी संपणार?

**नवरात्रात स्त्रीशक्तीची पूजा केली जाते, पण वास्तवात स्त्रियांना आजही अन्याय, हिंसा आणि दुजाभावाला सामोरे जावे लागते. देवीला अष्टभुजा देऊन शक्तिमान मानले जाते, तरी प्रत्यक्षात स्त्रियांना कमकुवत समजले जाते.**

खरंतर हा सृजनाचा उत्सव, स्त्रीत्वाचा उत्सव. शेतीचे नाते सांगण्याचा उत्सव. स्त्रिया आणि जमीन या सृजनशील आहेत. निर्मितीक्षम आहेत. प्रेम, कारुण्य, वात्सल्य आणि त्यासोबत लढवय्या, निर्भय, चुकीला चूक आणि बरोबरला बरोबर म्हणण्याची क्षमता ठेवतात. या संपूर्ण सजीव सृष्टीत स्त्रियांनी सर्वश्रेष्ठ असे जर कोण असेल, तर तो माणूस जन्माला घातला. आजही विज्ञान कितीही पुढे गेले असले, तरीही सरोगेट करून म्हणजेच गर्भाशय भाड्याने घेऊन का होईना पुरुषांना बाईच्या गर्भाशयातूनच बाईच्या पोटी जन्म घ्यावा लागतो. तरी तिचं सामाजिकीकरण होत असताना भारतासह देशभरामध्ये तिला दुजाभावाने वागविले जाते. तिला सतत हिंसेला तोंड द्यावे लागते.

भारत हा फार गमतीशीर देश आहे. एका बाजूला शक्तीची देवता म्हणून महिषासुरमर्दिनीची पूजा केली जाते, नवरात्र साजरी केली जाते. तिला देवी म्हणून शक्तिमान मानले जाते. तिच्या आठ भुजांमध्ये शस्त्र देऊन पायाखाली राक्षस देऊन ती कसा दुष्टांचा संहार करू शकते हे दाखविले जाते. पण प्रत्यक्ष बाईला नाजूक समजले जाते. कमकुवत समजले जाते. बायकाही त्या नाजूकपणाचा अभिमान बाळगताना दिसतात. नटणे, मुरडणे, चवळीच्या शेंगेसारखी असणे स्त्रियांना भूषणावह वाटते. नवरात्रीतील देवी म्हणून अष्टभुजा देवतेने शक्तिमान असले पाहिजे, पण आपण बाई म्हणून नाजूक, मुळूमुळू रडणारी असली पाहिजे, असाच स्त्रियांचा आणि पुरुषांचा देखील कुटुंबात समज असतो.

शाळांमध्ये बुद्धीची देवता म्हणून सरस्वतीची पूजा केली जाते. आमच्या लहानपणी तर शाळेत आम्ही दहा पैशाची वर्गणी काढून सरस्वतीचे पूजन करून फुटाणे वाटायचो. गूळ-चणे किंवा साखर-चणे हा शुक्रवारचा शाळेतला प्रसाद असायचा. सरस्वती ही देखील बाईच. बुद्धी हा शब्द देखील स्त्रीलिंगी. पण प्रत्यक्षात व्यवहारात मात्र बाई म्हणजे पायातली चप्पल. औरत माने पैर की जुती. बायकांना काही अक्कल असते का? बायकांची अक्कल घुटन्यात. बायका म्हणजे फिदी-फिदी हसणं, मुळूमुळू रडणं. पुरुषांच्या बोलण्यात येते की बाई आहे. तिच्या नादाला नका लागू. बायकांचा आणि अकलेचा काही संबंध आहे का? राखीव आलंय म्हणून त्यांना सहन करायचं. बाई आहे तिच्यासोबत डोकं नका लावू. बुद्धिवान असणं हे पुरुषांसाठी अनिवार्य आहे. स्त्रिया सुंदर असल्या की झाले. किंबहुना बुद्धिमान वगैरे स्त्रिया नसलेल्याच बरे. किंबहुना बुद्धिमान स्त्रियांचे पुरुषांना वावडेच आहे. बुद्धिमान स्त्रियांची पुरुषसत्ताक व्यवस्थेला भीती वाटते. त्यामुळे अगदी लग्न करताना देखील मुलगी बघायला जातात आणि मुलाचं मात्र करिअर, बुद्धी, पगार बघितला जातो. मुलाला कोणी स्वयंपाक येतो का? हा प्रश्न विचारत नाहीत आणि स्त्रिया कितीही शिकलेल्या असल्या, उच्च शिक्षण घेतलेल्या असल्या, कोणत्याही पदावर असल्या, प्रशासक, वकील, न्यायाधीश असल्या तरी तिचं दिसणं आणि तिचं स्वयंपाकपाणी करता येणे, तिने लग्न करणे, तिला मूल होणे अनिवार्य आहे.

आता दिवाळी येईल. धनाची देवता म्हणून लक्ष्मीची पूजा केली जाईल. धनलक्ष्मी, भाग्यलक्ष्मी याच्या पूजनाच्या दिवशी हजारो रुपयांच्या फटाक्यांच्या माळा उडवल्या जातील. पाच-दहा रुपयांसाठी गिऱ्हाईकांबरोबर घासाघिस करणारे व्यापारी लक्ष्मीपूजनाच्या दिवशी फटाक्यांवर हजारो रुपये खर्च करतील. लक्ष्मी ही देवता आहे. बाईमाणूस आहे. पण धनवान कोण आहे? जमीन, घर, मुलं, सर्व प्रकारची स्थावर, जंगम मालमत्ता ही पुरुषांच्या मालकीची आहे. एकूण कामाच्या दोनतृतीयांश कामं शेतीतील असो, घरातील असो किंवा समाजातील असो स्त्रिया करतात आणि जगभरामध्ये शंभर रुपयातील फक्त एक रुपया स्त्रियांकडे अर्थकारणात आलेला दिसतो. स्त्रिया करत असलेल्या दोनतृतीयांश कामाची पैशांमध्ये मोजदाद केली जात नाही. त्यामुळे देशाचा जीडीपी देखील चुकीचाच निकषांवर मोजला जातो. त्यामुळे घराचं अंदाजपत्रक असो की देशाचं, त्यामध्ये कुठेही स्त्रियांच्या कामाची नोंद नाही. स्त्रियांसाठी अंदाजपत्रकात त्यांची संख्या निम्मी असून देखील तरतूद नाही, स्त्रिया बिनपगारी, फुल अधिकारी. सर्वांत आधी उठणार, सगळ्यात शेवटी झोपणार, राबराब राबतात. लक्ष्मीपूजन करणारी इथली परंपरा या गृहलक्ष्मीची, मात्र आपल्या घरात रोज अवहेलना करणार.

म्हणूनच नवरात्रीच्या निमित्ताने प्रश्न विचारावासा वाटतो की, हा जगण्यातला भारतीय समाजातील विरोधाभास कधी संपणार? एका बाजूला तिची देवी म्हणून पूजा करायची आणि दुसऱ्या बाजूला मात्र तिला दासी म्हणून हिणवायचे. सगळ्या शिव्या आई- बहिणीवरून दिल्या जातात. पुरुषांच्या दाढीच्या ब्लेडपासून सगळ्या वस्तूंच्या विक्रीच्या जाहिरातींसाठी स्त्रिया शरीरप्रदर्शन करण्यासाठी यांना लागतात. पुरुषांना शहाणं करण्यासाठी आणि स्त्रियांना न्याय मिळवून देण्यासाठी स्त्रीमुक्ती चळवळीला संघर्ष करून ४२ हून अधिक कायदे बनवायला भाग पाडावे लागले. स्त्रियांच्या हिंसेचा प्रश्न हा जागतिक पातळीवर राजकीय बनतो आहे. गर्भाशयापासून थडग्यापर्यंत सर्वच वयातील स्त्रिया असुरक्षित आहेत. भय व हिंसा सोसत आहेत. भारतात तर आता नवीन विधेयकाप्रमाणे संसदेत आणि विधानसभेत ५० टक्के स्त्रिया खासदार आणि आमदार म्हणून निवडून येणार आहेत. पुरुषांच्या आदेशानुसार फेटा बांधून मोटारसायकलवर बसून आरक्षणाचा मोर्चा असेल, तलाक कायद्यातील बदलाविरोधातील मोर्चा असेल किंवा सीएए, एनआरसी विरोधातील शाहीन बाग असेल याठिकाणी मोठ्या संख्येने सहभागी झालेल्या या स्त्रिया स्वतःच्या बाबतीत झालेल्या किंवा अवतीभवती घडलेल्या स्त्रीविषयक हिंसक घटनेच्या विरोधात साधा ब्र देखील काढत नाहीत किंवा निषेधपत्र देखील काढत नाहीत. सर्व दुर्गा मंडळे, नवरात्री मंडळे यातील पदाधिकारी पुरुष आहेत. लाखो रुपयांची या मंडळांची उलाढाल आहे. पहाटे किंवा संध्याकाळी चौकाचौकातील नवरात्रोत्सवाच्या मंडळासमोर हजारोंच्या संख्येने स्त्रिया पायात चपला न घालता मळवट भरलेल्या, ठरलेल्या विशिष्ट रंगाच्या साड्या नेसून भक्तीने आरतीला टाळ्या वाजवताना दिसतात. निर्मितीचे प्रतीक असणाऱ्या आठही हातात शस्त्रं घेऊन समोर असणारी ती देवी प्रत्यक्ष जगण्याचे आपले प्रश्न सोडवण्यासाठी आपण केलेल्या नवरात्रातील उपवासामुळे प्रसन्न होऊन सोडवायला खरोखरीच येईल असे यांना खरंच वाटते का?

लोटलेला भक्तिसागर फॅशनेबल आहे. शिकल्या सवरलेल्या, पदवीधर असलेल्या स्त्रियांच्या चळवळीमुळे राखीव जागा मिळवून, नोकरी-कामधंदा करून पैसे मिळत असलेल्या, बचत गटातील सक्रिय असणाऱ्या, आशा, अंगणवाडी ताई, शिक्षिका, नोकरदार महिला जेव्हा आम्ही स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायविरुद्ध उभे राहण्यासाठी बोलवितो, मोर्चाला निमंत्रण देतो तेव्हा त्या पाठ फिरवतात. परंतु या मांडवासमोरच्या गर्दीत त्या टाळ्या वाजवत उभ्या दिसतात तेव्हा मन विषण्ण होते. या तथाकथित धार्मिक आणि श्रद्धेच्या बाजारातून बाहेर पडून जगण्याच्या प्रश्नाला या कधी भिडणार, असा प्रश्न पडतो?

## खड्ड्यांप्रति सहानुभूतीने वागावे...



हे दिवस पावसाळ्याचे आहेत... आतल्या खाचखळग्यांनी खड्डे होण्याचे आहेत. खड्ड्यांचा दिवस असतो. खड्ड्यांचा मौसम असतो. काही खड्डे बारमाही असतात. काही प्राचीन-पुरातन. सार्वजनिक बांधकाम की तत्सम कोणत्याही विभागाने या खड्ड्यांच्या वाट्याला जायचे नसते. खड्डा कोणताही असो, त्याला पुरातत्त्व विभागाचे संरक्षण असते. परवानगीशिवाय अशा खड्ड्यांची डागडुजी करता येत नाही आणि ही प्रक्रिया अतिशय किचकट असल्याने, तसेच ती कशी करावी याविषयीच्या पुरेशा माहितीचा अभाव असल्याने या खड्ड्यांचे पुरातनरूप कायम राहते. खड्ड्यांच्या जिवात जीव राहतो. बारमाही खड्ड्यांच्या वाट्याला डागडुजी येते. ती नको यायला, पण येते. ती नेमकी केव्हा येईल, याचा नेम नसतो. नेम कुणाचा कुणावर असतो. उघड असतो. आडून असतो. जीआर आला डागडुजीचा की कामाला हळूच सुरुवात होते. हा हळुवारपणा पावसावरच्या कवितेपेक्षाही नाजूक आणि नितळ असतो. इतका नाजूक की, दोन खड्डे बुजवले की तीन खड्डे बुजवण्याविनाच सोडायचे... इतके नाजूक मन. हळवेच मन ते. मनाचे ऐकणार नाही तर कोणाचे ऐकणार! काही खड्डे बुजले, काही सुटले की काय होते? बुजलेला खड्डा हा न बुजलेल्या खड्ड्याकडे बघतो. न बुजलेला खड्डा बुजलेल्या खड्ड्याकडे बघतो. दोघेही एकमेकांकडे बघतात. या बघण्यात, या नजरेत आपुलकी असते. एकमेकांविषयीची काळजी असते. हा काळजीचा सूर खड्ड्यातून जाणाऱ्या वाहनाचालकाच्या तोंडून निघतो, 'आह!' हा झटका वाहनचालकाला बसतो; पण तो सूर असतो त्या बुजलेल्या खड्ड्याचा. आंतरिक स्वर असतो. मनाची व्यथा असते. दुःख नि वेदना असते. एकच सवाल असतो, 'का बुजवले मला? आह!! का बुजवले मला?' अस्तित्वाचा विषय तो हा. अस्तित्व धोक्यात येत असेल तर आक्रोश होणारच!

# मदतीचेही सुयोग्य वाटप व्हायला हवे!

**मराठवाड्यातील पूर ओसरत असला तरी शेतीचे मोठे नुकसान झाले आहे. संकटात सापडलेल्या बळीराजाला दिलासा देण्यासाठी सर्वच संस्था, नेते, अभिनेते पुढे सरसावले असले तरी त्यांच्या मदतीचेही सुयोग्य वाटप व्हायला हवे.**



मराठवाड्यातील नागरिक गेल्या २५ ते ३० वर्षांपासून कोरड्या दुष्काळाचा सामना करत आहेत. मात्र यंदा आजच्या घडीला वरुणराजाने मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्रात धुमाकूळ घातला आहे. लाखो हेक्टर क्षेत्र बाधित झाले असून, नव्या पिकांच्या रुपाने हाती आलेला तोंडचा घास हिरावला वरुणराजाने हिरावला आहे. त्यामुळे असून, मराठवाडा, बीड, अहिल्यानगर, अमरावती, अकोला, परभणी आदी जिल्हे पाण्याखाली गेल्याने जगाचा पोशिंदा असलेल्या बळीराजावरील संकट अधिक गहिरे झाले आहे. आता पूरग्रस्तांना राज्यातील नेते, अभिनेते, संस्था सढळ हस्ते मदत करण्याचे आवाहन करीत आहेत. राज्य सरकारमार्फतही मदतीचा ओघ सुरू असला तरी या मदतीचेही सुयोग्य वाटप करणारी यंत्रणा उभारली जाणे आवश्यक बनले आहे.

महाराष्ट्रात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे अनेक जिल्ह्यांत गंभीर पूरस्थिती निर्माण झाली असून, शेतकरी, व्यापारी तसेच सर्वसामान्य नागरिक यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.

कोकण, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा तसेच विदर्भातील काही भागांत अतिवृष्टीमुळे घरे कोसळणे, शेतीचे नुकसान, जनावरांच्या जीवितहानीसह वाहतूक आणि वीजपुरवठा खंडित होण्याच्या घटना समोर येत आहेत. मराठवाड्यात पूर परिस्थिती अधिक गंभीर बनली आहे. त्याची दखल घेत राज्य सरकारने तत्काळ मदतकार्य हाती घेतले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपत्कालीन बैठका घेऊन जिल्हाधिकारी आणि तहसीलदारांना तातडीने मदत सुरू करण्याचे आदेश दिले आहेत. प्राथमिक टप्प्यात नुकसानग्रस्तांना तात्पुरती निवारा केंद्रे उपलब्ध करून देणे, अन्नपाणी, औषधे, स्वच्छता साहित्य यांची व्यवस्था करणे हे प्राधान्यक्रम ठरविण्यात आले आहे.

ज्या कुटुंबांचे घर पूर्णपणे कोसळले आहे, त्यांना तातडीची आर्थिक मदत जाहीर करण्यात आली असून शेतकऱ्यांच्या पिकांचे पंचनामे करून नुकसानभरपाई दिली जाणार आहे; मात्र मराठवाड्यासारख्या जिल्ह्यात पूरस्थिती निर्माण झाली असून, ओला दुष्काळ जाहीर करावा, अशी मागणी विरोधकांसह शेतकऱ्यांकडून होत आहे. त्याचबरोबर हवालदिल शेतकऱ्यांना ५० हजार रुपये प्रति हेक्टरी नुकसानभरपाई द्या, अशी मागणीही जोर धरू लागली आहे. पूरस्थिती निर्माण झालेल्या भागात राज्य आपत्ती व्यवस्थापन विभागाने आपली यंत्रणा कार्यरत ठेवली असून, एनडीआरएफ व स्थानिक बचाव पथकांना सर्वाधिक बाधित जिल्ह्यांत तैनात करण्यात आले आहे. सोलापूर, बीड, परभणी, कोल्हापूर, सातारा, सांगली, नांदेड, हिंगोली या जिल्ह्यांतील पूरग्रस्तांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आले आहे. आतापर्यंत हजारो नागरिकांना बाहेर काढून शाळा व समाजमंदिरांत आश्रय देण्यात आला आहे. शेतकऱ्यांच्या विमा दाव्यांची पूर्तता जलद गतीने व्हावी, यासाठी कृषी विभागाला राज्य सरकारने सूचनादेखील केली आहे. नुकसानग्रस्त विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक साहित्याची सोय, पुरामुळे बाधित झालेल्या लघुउद्योगांना तातडीची कर्जसवलत, तसेच रस्ते व पूल दुरुस्तीसाठी विशेष निधी देण्याची तयारी सरकारने दर्शवली आहे. कोणीही मदतीपासून वंचित राहणार नाही यासाठी राज्य सरकारने तातडीने उपाययोजना करत पूरग्रस्तांना दिलासा दिला आहे. सध्या संपूर्ण यंत्रणा सज्ज असून नागरिकांचे जीवित व मालमत्ता वाचविण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न सुरू आहेत.

महाराष्ट्रातील काही भागात सलग मुसळधार पावसामुळे पूरस्थिती निर्माण झाली. नद्या, नाले तुडुंब भरून वाहत असल्याने गावांचा संपर्क तुटला. अनेक ठिकाणी घरे, शेती व रस्त्यांचे मोठे नुकसान झाले. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारकडून तत्काळ मदतकार्य सुरू केले. आपत्ती व्यवस्थापन पथक, एनडीआरएफ तसेच स्थानिक प्रशासनाकडून बचाव व स्थलांतर कार्याला वेग देण्यात आला. शेकडो नागरिकांना सुरक्षित स्थळी हलविले. तात्पुरती निवारा केंद्रे उभारली. पूरग्रस्तांना अन्न, पाणी, औषधे आणि आवश्यक साहित्य पुरविण्यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज झाले.

मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांनी संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करत दस्तुरखुद्द पूरस्थितीचा ऑन दी स्पॉट जाऊन आढावा घेतला. पूरस्थितीवर सरकारने बारकाईने लक्ष ठेवले असून जीवितहानी टाळण्याला प्राधान्य दिले.

मराठवाड्यातील शेतकऱ्यांची अवस्था दिवसेंदिवस गंभीर होत चालली आहे. कधी दुष्काळ, कधी अतिवृष्टी, कधी अवकाळी पाऊस अशा संकटांच्या चक्रव्यूहात अडकलेला शेतकरी हवालदिल झाला आहे. शेती हा देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा असून शेतीनेच कोरोना काळात देशाला तारले आहे. गेल्या काही वर्षांत शेतकऱ्यांनी उत्पादन वाढवण्यासाठी खूप परिश्रम घेतले, परंतु शेतीमालाला बाजारभाव न मिळाल्याने त्यांची आर्थिक घडी विस्कटली आहे. पीक विमा योजनांच्या अंमलबजावणीत विलंब, बँकांचे कर्ज वसुलीचे दडपण, तसेच वाढते खत-औषधांचे दर यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. हवामान बदलामुळे पिकांची अनिश्चितता वाढली आहे. आज ग्रामीण भागात अनेक शेतकरी जगण्याची लढाई लढत आहेत.

दुसरीकडे शेतकऱ्यांच्या आत्महत्याही सुरू आहेत. त्यामागे उद्ध्वस्त झालेली कुटुंबे आणि तुटलेल्या स्वप्नांची कहाणी दडलेली आहे. सरकारकडून मदतीच्या घोषणा होतात, परंतु त्या प्रत्यक्षात पोहोचायला वेळ लागतो. महाराष्ट्रातील शेतकऱ्याला खऱ्या अर्थाने दिलासा मिळावा, यासाठी स्थिर व हमीभावाची धोरणे आखायला हवीत. शेतमालाला रास्त भाव मिळायला हवा. त्यांच्या पीक विम्याचा परतावाही वेळेवर मिळायला हवा. शेतमालाची साठवण व विपणन व्यवस्थाही अधिक सक्षम होणे गरजेचे आहे. राज्य सरकारने केंद्र सरकारकडे पाठपुरावा करून अधिकाधिक मदत शेतकऱ्यांना कशी मिळेल, याकडे लक्ष द्यायला हवे. राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका तोंडावर आल्या आहेत. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारनेही पूरग्रस्तांना तातडीने मदत करून दिलासा देण्याची गरज आहे.

# दसरा सणाची संपूर्ण माहिती

दसरा हा सण हिंदू धर्मामध्ये मोठ्या आनंदाने आणि उत्साहाने साजरा केला जातो. त्या दिवशी एकमेकांना शुभकामना दिल्या जातात. नवीन कपडे या सणानिमित्त खरेदी केले जातात तसेच सोने-चांदी देखील या सणानिमित्त खरेदी केले जातात. घराला आंब्याच्या पानांची व झेंडूच्या फुलांचे तोरणे लावतात. दसऱ्याला झेंडूच्या फुलांनी पूजा करण्याची प्रथा आहे. यंत्र, वाहने यांना झेंडूच्या फुलांच्या माळ घालतात. संध्याकाळी सोने लुटण्याची प्रथा आहे. म्हणजेच आपट्याची पाने लुटण्यासाठी गावाची वेश ओलांडून जात असतात. दसरा हा सण साजरा करण्याची परंपरा खूप जुनी आहे. याच दिवशी देवीने महिषासुर या राक्षसाचा वध केला होता. प्रभुरामचंद्र याच दिवशी रावणावर स्वारी करायला निघाले होते. पांडव ही अज्ञातवासात राहण्याकरिता यावेळी गेले होते, त्यावेळी त्यांनी आपली शस्त्रे शमीच्या झाडावर ठेवली होती. अज्ञातवास संपल्यावर तेथे त्यांनी परत ती शस्त्रे घेतली व त्या झाडाची पूजा केली. तो हाच दिवस आहे. दसरा म्हणजेच विजयादशमी. विजयादशमी म्हणजेच आश्विन शुद्ध दशमी. हा दिवस भारतीय संस्कृतीत महत्त्वाचा मानला जातो. याच दिवसाला आपण दसरा सण म्हणून साजरा करतो. देवीच्या घटांची स्थापना आश्विन शुद्ध प्रतिपदेला केल्यानंतर, देवीचे नवरात्र साजरे होते आणि दहाव्या दिवशी विजयादशमी साजरी केली जाते. दसरा हा सण शेतीविषयक लोक उत्सव म्हणून साजरा करत होते. कारण त्यावेळी पेरलेल्या शेतातील पहिले धान्य घरात येते. त्यामुळे शेतकरी हा उत्सव मोठ्या आनंदाने साजरा करत असतो. ग्रामीण भागातील शेतकरी हा उत्सव साजरा करताना, शेतातील धान्याचा तुला आपल्या फेट्यात लावण्याची पद्धत ही प्रचलित आहे. काही लोक तर टोपीवर लावतात. साडेतीन मुहूर्तातील एक मुहूर्त मानला गेलेल्या विजया दशमीला शुभ कार्य करतात. नवी वाहने, वस्तू तसेच कपड्यांची खरेदी, सोन्याची खरेदी देखील या दिवशी केली जाते. शिवाजी महाराजांनी प्रतापगड किल्ल्यावर भवानी देवीच्या उत्सवाला याच दिवशी शुभारंभ केला. पेशवाईमध्ये सुद्धा या सणाचे महत्त्व होते. बाजीराव पेशवे याच दिवशी पुढच्या स्वारीचे बेत कायम करीत असत. अनेक शूर पराक्रमी राजे याच दिवशी दुसऱ्या राज्यावर स्वारी करण्यास जात असत. यालाच सीमा उल्लंघन म्हणतात. विजयादशमी खास विजय मिळवून देणारा दिवस आहे असे मानले जाते.

**दसऱ्याचे महत्व :** दसरा या दिवशी ज्या वृक्षाची पाने लुटली जातात, त्या वृक्षाला अस्मंतक असे म्हणतात. या वृक्षाच्या पानांमध्ये औषधी सद्गुण आहे. तो म्हणजे पित्त व कफ दोषांवर गुणकारी आहे. नवरात्रीचा शेवटचा दिवस म्हणजे दसरा नऊ दिवस अधिष्ठान केलेल्या देवीने महिषासुर राक्षसाचा यादिवशी वध केला असे म्हटले जाते. तर रामाने ही याच दिवशी रावणाचा वध केल्याचे आपल्याला कळते. म्हणून रावणाचे दहन म्हणजेच वाईट वृत्तीचे दहन या दिवशी करावे असे मानले जाते. या दिवशी घरोघरी पूजाअर्चना करून शस्त्रांची, लक्ष्मीची आणि घरातील वाहनांची मनोभावे पूजा केली जाते. झेंडूचे फुले आणि आंब्याच्या पानांची तोरणे लावली जातात. झेंडूच्या फुलांनी देवघर तसेच देवींना हार लावल्या जातो. व संध्याकाळी एकमेकांना आपट्याची पाने देऊन त्यांच्या कुटुंबाला भरभरून शुभेच्छा दिल्या जातात. तसेच 'सोनं घ्या' आणि 'सोन्यासारखे रा-हा' असे म्हटले जाते. आणखी एक महत्त्व म्हणजे साडेतीन मुहूर्तातील एक मुहुर्त म्हणूनच दसऱ्याच्या मुहुर्तावर नवी खरेदी, नवे करार, नव्या योजनांच्या चांगल्या गोष्टीचा प्रभाव केला जातो, प्रारंभ केला जातो. अज्ञानावर ज्ञानाने विजय केला जातो. शत्रूवर पराक्रमाने तसेच वैऱ्यावर प्रेमाने विजय केला जातो. तसेच कुटुंबातील सर्व मंडळी एकत्रितपणे देवीला आपल्या विजयाची कामना करतात व जीवनात सतत कायम राहण्यासाठी आशीर्वाद मागतात.

**दसरा सण कसा साजरा करतात :** दसरा सण हिंदू धर्मात मोठ्या उत्साहाने व आनंदाने साजरा केला जातो. दसरा सणाच्या दिवशी घराला झेंडूच्या फुलांचे तोरण बांधले जाते. संध्याकाळी आपट्याची पाने सोनं म्हणून लहानांनी मोठ्यांना द्यायची पद्धत आहे. आपट्याची पाने देण्यासाठी एकमेकांच्या घरी सुद्धा काही लोक जातात व त्यांना शुभेच्छा देतात. ही एक जुनी प्रथा आहे आणि आजही ती कायम आहे. या दिवशी विविध पदार्थ सुद्धा घरी केले जातात. या दिवशी असे म्हणतात कि, ''दसरा सण मोठा,नाही आनंदाला तोटा.'' विजयादशमी हा सण देशभरात मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. दसरा या सणाच्या दिवशी स्त्रिया सोने खरेदी करतात. तसेच घरी असलेले वाहणे, शस्त्रे इत्यादींची झेंडूच्या फुलांनी पूजा करतात. तसेच सर्व कुटुंबातील मंडळी एकत्र येतात व देवीच्या दर्शनाला जातात. पर्यावरणाचा ऱ्हास होऊ नये म्हणून दसऱ्याच्या दिवशी आपट्याची पाने न देता नुसत्या शुभेच्छा देत असते, असे म्हटले जाते. संध्याकाळी रावणाच्या प्रतिकृतीच्या धरणाचे कार्यक्रमही आयोजित करतात. अशाप्रकारे दसरा हा सण साजरा केला जातो.

**दसरा सणाविषयी पौराणिक कथा :** दसरा विषयी सोने लुटण्याची एक प्रथा आहे. त्याविषयी एक कथा आहे. ती म्हणजे फार वर्षांपूर्वीची ही गोष्ट आहे. वरतंतू नावाचे एक ऋषी होऊन गेले, त्यांच्याकडे विद्या अभ्यासासाठी खूप शिष्य येत असत. बरेच शिष्य अभ्यास करून मोठे होत. त्यावेळी मानधन किंवा फी देण्याची पद्धत नव्हती. त्यामुळे शिक्षण संपल्यावर विद्यार्थी गुरु दक्षिणा देत असत. या ऋषीकडे कौत्स नावाचा एक शिष्य होता. त्याचे शिक्षण पूर्ण झाल्यावर गुरूने त्याला घरी जाण्यास परवानगी दिली. त्याने ऋषींना विचारले, की तुम्ही गुरुदक्षिणा म्हणून काय घेणार? मी तुम्हाला गुरुदक्षिणा म्हणून काय देऊ? तुम्ही मागाल ती गुरू-दक्षणा मी देईल. मग त्या ऋषीने याची परीक्षा घ्यावयाचे ठरविले. परंतु ऋषीने कौत्सला प्रत्येक विद्याबद्दल एक कोटी सुवर्णमुद्रा याप्रमाणे १४ विषयाबद्दल ज्ञान दिल्यामुळे चौदा कोटी सुवर्ण मुद्रा आणावयास सांगितले. ते ऐकून कौत्स गंगावला गेला. तो रघु राजाकडे गेला. परंतु राजाने त्याच वेळी विश्वजीत यज्ञ केल्यामुळे खजिना संपला होता. तरीसुद्धा राजाने कळसाकडे तीन दिवसांची मुदत मागितली आणि त्याने इंद्रावर स्वारी करण्याचे निश्चित केले. इंद्राला रघुराजाचा पराक्रम माहीत होता. त्याने कुबेराला सारी हकीकत सांगितली. इंद्राने आपट्याची पानांच्या आकाराची सोन्याची नाणी बनवून ती पावसासारखी राजाच्या राजवाड्यात पाडली. कौत्स त्या सुवर्णमुद्रा घेऊन वरतंतू या ऋषीकडे गेला. आणि त्या ऋषीला गुरुदक्षिणा घेण्यास विनंती केली. परंतु ऋषींनी त्या घेण्यास नकार दिला आणि १४ कोटी सुवर्णमुद्रा परत नेण्यास राजाने नकार दिल्यामुळे कौत्साने त्या मुद्रा आपट्याच्या झाडाखाली ठेवून लोकांना लुटायला सांगितले. अनेकांनी त्या वृक्षांची पूजा केली व पाहिजे तेवढ्या मुद्रा लुटल्या. तो दिवस दसऱ्याचा होता म्हणून त्या दिवसापासून या झाडाची पूजा करून सोन्याची नाणी लुटण्याची प्रथा सुरू झाली असे म्हटले जाते. याविषयीची आणखीन एक दंतकथा आहे. ती म्हणजे दसऱ्याच्या दिवशी पांडव अज्ञातवास संपवून परत निघाले अशीही आख्यायिका आहे. पांडवांनी अज्ञातवासात जाण्यापूर्वी आपली शस्त्रे शमीच्या झाडावरील एका ढोलीत लपवून ठेवली होती. त्यापैकी गांडीव धनुष्य आणि काही बाण रूपात असलेल्या अजुर्नाने विराटच्या गाई सोडवून आणण्यासाठी वापरले आणि त्या कामगिरीनंतर परत झाडावर ठेवून दिले. अशी कथा आढळून येते. यामुळे विजयादशमीला शमीच्या झाडाची सुद्धा पूजा करून त्याला औक्षण केले जाते. अशाप्रकारे दसरा हा सण भारतात विविध ठिकाणी मिठाई वाटून व एकमेकांना, शुभेच्छा देऊन मोठ्या आनंद व उत्साहाने साजरा केला जातो.

**दसरा का साजरा केला जातो?**

महिषासुर आणि त्याच्या सैन्याने हैराण केल्यामुळे देवीने या राक्षसाशी नऊ दिवस युद्ध केले आणि १० व्या दिवशी महिषासुराचा अंत केला. त्यामुळे नवरात्रीनंतर दस-रा साजरा करण्याची परंपरा आहे; तर प्रभू श्रीरामांनी रावणावर विजय मिळवून त्याचा वध केला, तोही याच दिवशी. या अभूतपूर्व विजयामुळे या दिवसाला विजयादशमी, असे म्हटले जाते.

**दसरा पूजा घरी कशी करावी?**

चौकीवर देवीची मूर्ती ठेवा आणि त्याभोवती पुस्तके लावा. त्यानंतर, दीया आणि अगरबत्ती लावा आणि आपल्या मुलांसह देवीला कुंकुम, हळदी आणि फुले अर्पण करा . दसऱ्याला देशभरात रावणाच्या पुतळ्याचे दहन केले जाते.

**दसऱ्याचे महत्व काय आहे?**

हिंदू धर्मात दसऱ्याला विशेष महत्त्व आहे. यंदा १२ ऑक्टोबरला दसरा सण साजरा होणार आहे. दसऱ्याच्या दिवशी प्रभू रामाने रावणाचा वध करून युद्ध जिंकले. हा सण असत्यावर सत्याचा आणि अधर्मावर धमार्चा विजय म्हणूनही साजरा केला जातो



## चला आज हा आला दसरा !

चला आज हा आला दसरा !
पाउल पुढतें टाकायाला,
सीमोल्लंघन करावयाला,
आनंदानें नाचायाला,
सणांमध्यें सण हाच खरा !
चौमासांला आतां विसरा !
मुसळधार तो पाऊस वरला,
तुडवित पायांखालीं चिखला,
शेत पेरिलें येत पिकाला,
येतां आनंदाचा दसरा !
पहिल्या दुभत्या गाई विसरा !
उन्हाळ्यांत त्या उडाल्याच ना ?
त्या गाईच्या खिल्लारांना
नव्या दमानें सोडा राना,
चला खाउं द्या पहांटचारा !
करा जरासा मुखडा हंसरा !
आतां कां हीं तोंडें रडवीं ?
कडवीं बीजें करी गोडवीं,
फुटलें तुटलें पुन्हांहि जोडवी,
आला ना तो तुमचा दसरा !
चला रुढिवर आतां घसरा !
टाकुनि सीमा मृत धर्माच्या,
दंभाच्या या अंधपणाच्या,
जुनेपणाच्या, अहंपणाच्या
सीमोल्लंघनकालचि दसरा !
जुन्या मतांचा जाळा कचरा

नव्या मतांचे जे राऊत,
खरेखुरे मायेचे पूत,
येऊं द्या धैयार्ला ऊत,
नका हातचा दवडूं दसरा !
नका हातचा दवडूं दसरा !
जुन्या ऋषींना सलाम ठोकुनि
करा तयारी छाती ठोकुनि
आजकालच्या ऋषींमागुनी
जा तिकडे नेइल हा दसरा !
श्रुतिस्मृतींना आतां विसरा !
अंधभक्तिचा पांगुळगाडा
मोडुनि तोडुनि उपडा पाडा !
पाताळीं तो नेउनि गाडा !
करा साजरा यापरि दसरा !
नेट धरा धीराचा जबरा !
खुल्या मनाचा अबलख घोडा
जीन नको उप्लाणी सोडा !
जेरबंद वा लगाम तोडा !
सीमोल्लंघनकालचि दसरा !
जुन्यापुराण्या चिंध्या विसरा;
जरि पटका घ्या सुधारणेचा !
भगवा शेंडा नव्या मताचा !
नव्या दमानें फडकविण्याचा
मानवधमार्चा हा दसरा !
नव आशेच्या तृणांकुरांचा

तुरा शिरावर; चढवा साज,
मढवा न्यायाचें शिरताज,
समचित्ताचे बरकंदाज
चला जमूं द्या जमाव तुमचा.!
काळाचें मैदान अफाट,
दिसतां कोठें खंदक खांचा
द्या घोडयाला अमीन टांचा
वांयावरच्या करवा नाचा
कापा रस्ता आटोकाट !
ला निघूं द्या असली स्वारी;
जुनाट पोकळ नगारखाना
उंटावरला कुणी शहाणा
वाजवितां, त्या आधीं हाणा !
घ्या कृष्णाची करीं “तुतारी”
रुढीच्या किल्ल्यावर स्वारी,
“अगरकरां”ची झडवा नौबत !
“भागवतां”ची धराच हिंमत !
“केशवचंद्रां”चें घ्या चिलखत !
फुंका “कृष्णा”चीच “तुतारी.”!
रुढीचा गड खालीं उतरा,
पाकोळ्या घुबडांना उडवा,
जिवंत सोनें अखंड लुटवा,
कृपण मनाचा रस्ता खुटवा.
असा साजरा कराच दसरा !
कसले पूर्वज घेउनि बसलां ?

होते मोठे सोन्या भरले
त्यांचें आतां काय राहिलें ?
त्यांचें त्यांच्या मागुनि गेलें.
शिक्का कायमचा तो कसला !
उगाच खाउनि बसतां हाय !
पूर्वज आले चार पावलें,
एकसारखे पुढें सरकले,
म्हणुनिच ना ते इतके आले ?
त्यांना पूर्वज नव्हते काय ?
कुंभारासारखेच लोटे,
खोटें ठरतें तत्त्व आज तें.
पूर्वज संतत पुढें चालते
घायकूत ही नसती धरिते
बडे बापके तुम्ही बेटे !
रडत बैसले महारमांग.
दीनपणाला गर्वे छळतें,
अज्ञानाला भिउनी पळतें,
त्यां वर घ्याया नच जें वळतें
उच्चत्वा त्या लावा आग !
थांबा, ऐका देउनि कान–
सुकल्या हातीं बाला कोमल,
तशाच विधवा करिती तळमळ;
फत्तर फुटतिल येउनि कळकळ.
कुठला पोकळ गताभिमान ?
चला उठारे बांधा कंबर !

तुमच्या पुरती ही घी-शक्कर
टाकुनि, रुढीशीं द्या टक्कर !
युद्ध माजवा रे घनचक्कर !
फोडा कुजकें हेम अवडंबर !
गेल्या धमार्चें हें भूत
पाहुनि बसलां कां रे भीत ?
नव्या मतांचे भालाईत
घोडे अपुले या उडवीत,
नातरि रडते व्हा राऊत !
अनंतकाळाचें मैदान,
हिम्मतवाले चाबुकस्वार,
उत्साहाची करि तलवार,
चित्साक्षीची ढाल तयार,
घोडा फिरवा रानोरान !
सरतां काळाचें मैदान
घोडा उडवा मग आकाशी,
भिडवा नेउनि स्वगार्पाशीं
पूर्णपणाशीं ईशपदाशीं,
तरीच होईल दसरा छान !
कुणी मनाचा असेल कच्चा
करील त्यालाही मनशूर
या गाण्यांचे गाउनि सूर
“केशवपुत्रा”चा महशूर
“गोविंदाग्रज” चेला सच्चा !

-गोविंदाग्रज

# दसऱ्याला आपट्याची पाने सोने म्हणून का देतात



**चा**तुर्मासातील एक महत्त्वाचा सण म्हणजे दसरा. साडेतीन मुहुर्तांपैकी दसरा एक मानला जातो. चातुमार्सात अश्विन महिन्यातील शुद्ध प्रतिपदेपासून ते नवमीपर्यंत नवरात्र साजरे केल्यानंतर दहाव्या दिवशी म्हणजेच दशमीला दसरा साजरा केला जातो. या सणाला धन, ज्ञान आणि भक्तीची पूजा केली जाते. त्याचे प्रतीक म्हणून सोने म्हणजेच आपट्याची पाने, पाटी-पुस्तके अर्थात सरस्वती देवीची आणि शस्त्रास्त्रांचे पूजन करण्यात येते. धनसंपदा (महालक्ष्मी), शक्ती (महाकाली), ज्ञानसंपदा (महासरस्वती) या तीन शक्ती देवतांचे स्मरण दसऱ्याला केले जाते. नवरात्रौत्सवात बसविलेल्या देवी मूर्ती आणि घटांची मिरवणूक काढून विसर्जन केले जाते. दसऱ्याला सोन्याचे प्रतीक म्हणून आपट्याच्या झाडाची पाने देण्याची प्रथा आजही टिकून असल्याचे दिसून येते. विजयादशमी म्हणजे दसऱ्याला आपट्याचीच पाने सोने म्हणून का वाटली जातात? याबाबत जाणून घेऊया...

**विजयादशमी आणि दसरा**

दसरा शब्दाची एक व्युत्पत्ती दशहरा अशीही आहे. दश म्हणजे दहा आणि हरा म्हणजे हरल्या आहेत. दर्सयाच्या आधीच्या नऊ दिवसांत म्हणजेच नवरात्रात देवीच्या शक्ती रुपांनी दाही दिशांवर विजय मिळवला, असे सांगितले जाते. विजयाच्या संदर्भात या दिवसाला दशहरा, दसरा आणि विजयादशमी अशी नावे आहेत. श्रीरामांनी रावणावर विजय मिळवून त्याचा वध केला, तोही याच दिवशी. या अभूतपूर्व विजयामुळे या दिवसाला विजयादशमी असे म्हटले जाते. पांडवांनी अज्ञातवास संपताच शक्तीपूजन करून शमीच्या वृक्षावरची आपली शस्त्रे परत घेतली आणि विराटाच्या गायी पळवर्णाया कौरव सैन्यावर स्वारी करून विजय मिळवला, तोही याच दिवशी. या दिवशी सीमोल्लंघन, शमीपूजन, अपराजितापूजन आणि शस्त्रपूजा ही चार कृत्ये करायची असतात.

**आपट्याची पाने सोने वाटण्याची परंपरा**

दर्सयाच्या दिवशी इष्टमित्रांना, आप्तेष्टांना, नातेवाईकांना आपट्याची पाने 'सोन' म्हणून वाटण्याची प्रथा महाराष्ट्रात आहे. या प्रथेलाही ऐतिहासिक महत्त्व आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे मावळे वीर मोहिमेवर गेल्यानंतर शत्रूचा प्रदेश लुटून सोन्या-नाण्यांच्या रूपाने संपत्ती घरी आणत असत. असे हे विजयी वीर किंवा शिलेदार मोहिमेवरून परत आले की, दारात त्यांची पत्नी किंवा बहीण त्यांना ओवाळीत असे. घरात गेल्यावर आणलेली लूट देवापुढे ठेवीत. नंतर देवाला आणि वडिलधारी व्यक्तींना नमस्कार करून आशीर्वाद घेत असत. या घटनेची स्मृती सध्याच्या काळात आपट्याची पाने सोने म्हणून वाटण्याच्या रूपाने शिल्लक उरली आहे, असा एक मतप्रवाह आहे.

**आपट्याच्या पानांचे धार्मिक महत्त्व**

आपट्याला शास्त्रीय नाव बौहिनिया रेसीमोसा आहे. दर्सयाच्या दिवशी शमीची पाने एकमेकांना प्रदान करू नयेत, तर ती पाने आपल्या वास्तूत ठेवावीत. यामुळे वास्तूतील वायूमंडल शुद्ध होण्यास मदत होते. शमी ही तेजतत्त्वरूपी आ-हे. आपट्याची पाने ही आप व तेज या कणांशी निगडित असल्याने शमीकडून प्रक्षेपित झालेल्या लहरी या आपट्याच्या पानांकडून ग्रहण केल्या जाऊन त्या आपतत्त्वाच्या बळावर प्रवाही बनवल्या जातात व जेव्हा या आपट्यांच्या पानांचे आदान-प्रदान होते, त्या वेळी हे तेजतत्त्वरूपी कण आपट्याच्या पानातून जिवाच्या तळहाताकडे संक्रमित होतात. यामुळे जिवाच्या हातावरील देवतांच्या स्थानांचे बिंदू कार्यरत होऊन त्या बिंदूतून ते ते आवश्यक तत्त्व जिवाच्या सूक्ष्मदेहापर्यंत आपकणांच्या साहाय्याने झिरपले जाते. या कारणास्तव शमीची पाने घरात ठेवून दर्सयाच्या दिवशी वायूमंडलाची शुद्धी करावी व त्यानंतर आपट्याच्या पानांतून तेजतत्त्व एकमेकांना प्रदान करून ईश्वरी राज्य स्थापनेला लागणारा क्षात्रभाव जागृत अवस्थेत ठेवावा, असे सांगितले जाते.

**आपट्याची पूजा करताना पुढील मंत्र म्हणतात**

अश्मन्तक महावृक्ष महादोषनिवारण।
इष्टानां दर्शनं देहि कुरु शत्रुविनाशनम्।।

याचा अर्थ असा की, हे अश्मंतक महावृक्षा, तू महादोषांचे निवारण करणारा आहेस. तू मला माझ्या मित्रांचे दर्शन घडव आणि माझ्या शत्रूंचा नाश कर, अशी प्रार्थना करून त्या वृक्षाच्या मुळ-ाशी तांदूळ, सुपारी आणि सुवर्णनाणे विकल्पाने तांब्याचे नाणे ठेवतात. मग वृक्षाला प्रदक्षिणा घालून त्याच्या बुंध्याजवळची थोडी माती आणि त्या वृक्षाची पाने घरी आणतात. यानंतर आपट्याची पाने सर्व नातलग आणि मित्रमैत्रीणींमध्ये वाटतात.

**स्वतः समवेत इतरांचाही विचार करण्यास शिकवणारा सण दसरा**

विजायदशमी हा देवीचा सण आहे आणि देवी ही शक्तीची देवता आहे. यासाठी अश्विन शुद्ध प्रतिपदेला देवीचे आवाहान करुन रामनवमी प्रमाणे नऊ दिवस तीचे भजन, पूजन, कीर्तन करायचे असते. अष्टमीच्या दिवशी सरस्वती स्वरूपी भगवतीचे पूजन नवमीच्या दिवशी शस्त्र देवीचे पूजन आणि दशमीच्या दिवशी शांततेचे पूजन करायचे असते. हे शांततेचे पूजन आपल्या गावच्या शिवेबाहेर जाऊन करायचे असते. गावाबाहेरही शांतता राखुन जिकडे तिकडे सुख समृद्धी यावी असा यामागचा उद्देश आहे. बाहेर सर्वत्र शांतता राखण्यासाठी शस्त्राचे प्रदर्शन करायचे असते आणि शत्रू असेल तर त्याचे पारिपत्य करण्यासाठी या दिवशी निघायचे असते. शत्रूचे पारिपत्य करून शांतता प्रस्थापित केल्यानंतर सर्वांना सोने वाटायचे असते.

**तमोगुण आणी वाईट शक्ती यांचा नाश होणे आणि परस्परांप्रती प्रीती जागृत होणे**

देवी तत्त्व कार्यरत असल्यास सगुण स्तरावर तमोगुण आणि वाईट शक्ती यांच्या नाशाचे कार्य होत असते अन केवळ विष्णु तत्त्व कार्यरत असल्यास निर्गुण स्तरावर तमोगुण आणि वाईट शक्ती यांच्या नासाचे कार्य होत असते असे शास्त्र आहे. दर्सयाच्या दिवशी ताराक देवितत्त्व विष्णु तत्त्वाच्या समवेत एकत्रपणे कार्यरत होते. या दोन भिन्न तत्त्वाने संयुक्तपणे कार्य केल्यामुळे तमागुण आणि वाईट शक्ती यांच्या नाशाचे कार्य संपन्न होण्याबरोबर या दोन तत्त्वांमधील परस्परांविषयीची प्रीती जागृत होऊन त्यांच्यातील तत्त्वांकडून विनाशाचे कार्य करण्याबरोबरच सज्जनतेचे म्हणजे स्थिती संबंधीचे कार्य ही आपोआप होऊ लागते. देवी आणी विष्णू यांच्या संयुक्त कार्यरत तत्त्वांकडून प्रक्षेपित होणाऱ्या प्रीतीयुक्त कल्याणकारी स्थितीजन्य लहरी संपूर्ण ब्रह्मांडात पसरतात. त्यामुळे सर्जकतेच्या कार्यास गती प्राप्त होते आणि त्यामुळे पीक चांगले होणे भरभराट होणे यासारखे परिणाम दिसून येतात. स्थितीजन्य कार्य करण्यासाठी श्रीविष्णूची सहयोगी म्हणून श्रीलक्ष्मी त्यांच्या बरोबर प्रत्येक अवतारामध्ये श्रीलक्ष्मीही सहभागी असते आणी दोघेही मानवदेह धारण करुन पृथ्वीतलावर एकाच वेळी अवतार घेतात .

**श्री राम आणि हनुमान तत्त्वे अन्न छात्रवृत्ती जागृत करणारा दसरा सण**

दसऱ्याच्या दिवशी ब्राह्मंडात श्रीराम तत्त्वाच्या तारक, तर हनुमान तत्त्वाच्या मारक लहरीचे एकत्रीकरण झालेले असते. दसरा या तिथिला जिवाचा छात्र भाव जागृत होतो. आणि छात्रभावातूनच जिवावर छात्रवृत्तीचा संस्कार होत असतो. दसऱ्याला श्रीराम आणि हनुमान यांचे स्मरण केल्याने जीवात दास्यभक्ती निर्माण होऊन श्रीरामाचे तारक म्हणजेच आशीर्वादरूपी तत्त्वे मिळण्यास साह्य होते. दसऱ्याच्या दिवशी ब्रह्मांडात लाल आणि तांबूस रंगांच्या स्प्रिंग सारख्या लहरी कार्यरत अवस्थेत असतात. या लहरींमुळे जिवाची आत्मशक्ती जागृत होण्यास साह्य होऊन जीवांच्या मारक भावाबरोबरच नेतृत्व गुणांमध्येही वाढ होते.




# दसऱ्याचा दिवस शुभ कार्यासाठी उत्तम!

**द**सरा किंवा विजयादशमी हा सण वाईट-ावर चांगल्याच्या विजयाचे प्रतीक म्हणून साजरा केला जातो. हिंदू धर्मात दसऱ्याला विशेष महत्त्व आहे. दसऱ्याच्या दिवशी प्रभू रामाने रावणाचा वध करून युद्ध जिंकले. हा सण असत्यावर सत्याचा आणि अधर्मावर धमार्चा विजय म्हणूनही साजरा केला जातो. या दिवशी देवी दुर्गेने महिषासुराचा वध केला होता. या दिवशी रावण दहनासह देवी दुर्गेच्या मूर्तीचेही विसर्जन केले जाते.

**दसऱ्याला केलेली शुभ कार्ये फलदायी मानली जातात**

दसरा किंवा विजयादशमी ही सर्व सिद्धीची तिथी मानली जाते. त्यामुळे या दिवशी केलेली सर्व शुभ कार्ये फलदायी मानली जातात. ज्योतिषशास्त्रानुसार दसऱ्याच्या दिवशी लहान मुलांचे अक्षरलेखन, घर किंवा दुकान बांधणे, मुंडण, नामकरण सोहळा, अन्नप्राशन, कान टोचणे, यज्ञोपवीत संस्कार आणि भूमिपूजन इत्यादी शुभ मानले जातात. दसऱ्याच्या दिवशी पूर्ण भक्तिभावाने श्री रामचरितमानसाचे पठण करणे अत्यंत शुभ मानले जाते. दसऱ्याच्या दिवशी गुप्त दान केल्याने जीवनात सुख-समृद्धी येते.

**सऱ्याच्या दिवशी चुकूनही हे काम करू नका**

विजयादशमीच्या दिवशी विवाह विधी निषिद्ध मानले जातात. दसरा हा सण वाईटावर चांगल्याच्या विजयाचे प्रतीक आहे, म्हणून या दिवशी चुकूनही कोणतेही वाईट कृत्य करू नये. मयार्दा पुरुषोत्तम रामाचा आशीर्वाद घ्यायचा असेल तर चुकूनही तुमची प्रतिष्ठा विसरता कामा नये. कोणत्याही व्यक्तीचा अपमान करू नये. विजयादशमीच्या दिवशी कोणाशीही वाद घालू नका, खोटे बोलू नका किंवा कठोर शब्द बोलू नका. या दिवशी व्यक्तीने मांस, दारू इत्यादी सूडबुद्धीच्या गोष्टींपासून दूर राहावे. या दिवशी झाडे तोडणे देखील अशुभ मानले जाते.

## मावा बासुंदी

**साहीत्य:** १/२ कप मावा
२ कप दूध
२ टेबलस्पून साखर.. (ऐच्छिक.. जास्त कमी घालू शकतो)
२ टेबलस्पून काजू बदाम पिस्त्याचे काप
७ आठ केशराचे तुकडे

**कृती:** मावा किसून किंवा बारीक कापून घ्या.. पॅनमध्ये मावा घालून मंद गॅसवर दोन तीन मिनीटे भाजून घ्या.. आधीच तापवलेले दूध घालून मिक्स करा.केशर धागे लगेच घालावे. म्हणजे बासुंदी ला रंग छान येतो. साखर व अर्धे ड्रायफ्रुट्स घालून मिक्स करा व दहा मिनिटे मंद आचेवर दूध आटवून घ्यावे. सर्व्हिंग बाऊल मध्ये काढून वरून काजू बदाम पिस्त्याचे काप भुरभुरावे व मस्त क्रिमी मावा बासुंदी तयार होते.. पुरी, चपाती सोबत सर्व्ह करा किंवा बाऊल मध्ये घेऊन चमच्याने पिऊ शकता..



# तुळजाभवानी देवस्थानचा मायेचा हात

## गतिमंद विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप... पूरग्रस्तांना मदतीचा हात




**■बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

मुंबईत नवरात्रोत्सवाची धूम आगळीवेगळी असली तरी चेंबूर येथील आई तुळजाभवानी मंदिर देवस्थानच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविण्यात येत असतात. मतिमंद विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप, गरीब गरजू रुग्णांना औषधे उपलब्ध करुन देणे असे विविध सामाजिक बांधिलकी जपत देवस्थानच्या वतीने नवरात्रोत्सव साजरा करण्यात येतो. मंदिराला सुमारे ५० वर्षे होत आले असून देवीच्या दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी होते, अशी माहिती तुळजाभवानी मंदिर देवस्थानचे वरिष्ठ पदाधिकारी काशीनाथ जानू विशे यांनी 'दैनिक नवशक्ति' बोलताना सांगितले.

नवरात्रोत्सव म्हटलं की ९ दिवस दांडिया नृत्य हेच चित्र डोळ्यासमोर येते. नवरात्रोत्सवात चनिया चोली असा पोषाख परिधान करत लहान-ग्यापासून मोठ्यांपर्यंत सगळेच दांडियाचा आनंद लुटतात. नवरात्रोत्सवाच्या ९ दिवसांत मुंबईत उत्साह जल्लोषात नाहून निघते. मात्र चेंबूर येथील आई तुळजाभवानी मंदिर देवस्थान आजही पारंपरिक पद्धतीने नवरात्रोत्सव साजरा करत आला आहे. आई तुळजाभवानी मंदिर देवस्थान हे ५० वर्षांपूर्वीचे मंदिर असून मंदिरात स्थापन देवीची मनोभावे पूजा अर्चा करण्यात येते.

आई तुळजाभवानी मंदिरात नेहमीच भाविकांची गर्दी असते. मात्र नवरात्रोत्सव गर्दी अधिकच होते. विशेष म्हणजे नवरात्रोत्सव दांडियाचे आयोजन न करता वृक्षलागवड, आरोग्य शिबिर असे उपक्रम राबविण्यात येतात, असेही त्यांनी सांगितले.

लातूर जिल्ह्यात भूकंप झाला होता त्यावेळी देवस्थानच्या वतीने त्याठिकाणी मदतीचा हात पुढे केला होता. यंदाही मराठवाडा परभणी धाराशिव बीड आदी जिल्ह्यांत पावसाने थैमान घातले असून पूरस्थिती ओढावली आहे. शेतपिकाचे नुकसान जीवितहानी झाली आहे. मदत म्हणून मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षात देवस्थानच्या वतीने धनादेश सुपूर्द करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. शहापूर केतकी पाडा येथील गावातही देवस्थानच्या वतीने दिपावली फराळ, अर्पण साड्या फळं आदी साहित्यांचे वाटप करण्यात येते, असे ही काशीनाथ विषद यांनी सांगितले.

### अतिवृष्टीग्रस्तांना उल्हासनगर महापालिकेकडून मदतीचा हात




**उल्हासनगर।** राज्यात अतिवृष्टीमुळे शेती, घरे आणि पाळीव प्राण्यांचे मोठे नुकसान झालेल्या शेतकरी आणि नागरिकांना दिलासा देण्यासाठी उल्हासनगर महानगरपालिकेने मदतीचा हात पुढे केला आहे. या संकटाच्या काळात नुकसानग्रस्तांना आर्थिक मदत करण्यासाठी महापालिका आयुक्त मनीषा आव्हाळे यांनी महापालिकेतील सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना त्यांच्या वेतनातून स्वेच्छेने रक्कम देण्याचे कळकळीचे आवाहन केले आहे. आयुक्तांनी स्वतः आपल्या वेतनातून काही रक्कम कपात करून पूरग्रस्तांना देण्याचा निर्णय घेतला आहे. याच धर्तीवर त्यांनी आपल्या सर्व सहकाऱ्यांना मदतीसाठी पुढे येण्याची विनंती केली आहे. परिपत्रकान्वये आयुक्त मनीषा आव्हाळे यांनी महापालिकेच्या लेखा विभागाला त्वरित कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत. ज्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना वेतनातून स्वेच्छेने रक्कम कपात करायची आहे, त्यांच्याकडून किती रक्कम कपात करावी याबाबतचे पत्र तातडीने भरून घ्यावे. जमा झालेली एकत्रित रक्कम त्वरित राज्याचे मुख्यमंत्री सहाय्यता निधीमध्ये जमा करण्याची आवश्यक प्रक्रिया पूर्ण करावी. ज्या कर्मचाऱ्यांनी स्वेच्छेने रक्कम देण्याची तयारी दर्शविली आहे, त्यांच्या या महिन्याच्या मासिक वेतनातून ती रक्कम कपात करण्याची कार्यवाही करावी अशी सूचना दिली आहे. आयुक्तांनी आवाहन केले आहे की, महापालिकेच्या वतीने पूरग्रस्त शेतकरी आणि नागरिकांना अधिकाधिक मदत व्हावी, यासाठी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सहकार्य करावे. महापालिकेच्या या निर्णयामुळे राज्यातील नैसर्गिक आपत्तीमुळे त्रस्त झालेल्या नागरिकांना मोठा दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

# अनधिकृत बांधकामांवर सिडकोची 'वक्रदृष्टी'

## वीज-पाणी जोडण्या तोडणार, खरेदीदारांनाही कडक इशारा

**■नवी मुंबई । प्रतिनिधी,**




सिडकोच्या भूखंडांवर अनधिकृत बांधकाम करणाऱ्या विकासकांविरोधात सिडकोने सुरू केलेल्या तोडक कारवाईला सर्वोच्च व उच्च न्यायालयाने नुकताच नकार दिला आहे. यामुळे शहरातील अनधिकृत इमारतींवर आता कठोर कारवाई केली जाणार असल्याचे सिडकोने स्पष्ट केले आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनंतर सिडकोच्या अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाने जाहीर सूचना प्रसिद्ध केली आहे. या सूचनेनुसार, अनधिकृत इमारतींचे पाणी, वीज, मलनिस्सारण जोडण्या तसेच व्यवसाय परवाने तत्काळ बंद करण्याचे सूचित करण्यात आले आहे. सदर अनधिकृत बांधकामांवर तोडक कारवाई होणार असल्याचेही नमूद केले आहे. सर्वोच्च न्यायालयाने १३ नोव्हेंबर व १७ डिसेंबर रोजी दिलेल्या आदेशांमध्ये स्पष्ट केले आहे की, परवानगीशिवाय उभारलेल्या इमारतींना कोणत्याही सुविधा देऊ नयेत. भोगवटा प्रमाणपत्र असलेल्या इमारतींनाच पाणी, वीज, मलनिस्सारण व व्यापारी परवाने द्यावेत आणि अनधिकृत बांधकामांवर सिडकोने तातडीने निष्कासनाची कार्यवाही करावी. ग्रामपंचायत ना-हरकत दाखला, मालमत्ता कर पावती, वीज व पाणी बिल हे दस्तऐवज जमिनीच्या मालकीचा पुरावा म्हणून ग्राह्य धरले जाणार नाहीत, असे सिडकोने यापूर्वीच स्पष्ट केले आहे.

### कागदपत्रे नसणाऱ्यांवर कारवाईचा बडगा

सिडकोच्या भूमापकांनी केलेल्या पाहणीत अनेक ठिकाणी सरकारी जमिनीवर अतिक्रमण करून परवानगीशिवाय बांधकामे करण्यात आल्याचे उघड झाले आहे. या प्रकरणी अनधिकृत बांधकामधारकांना मालकी हक्क व बांधकाम परवानगीचे कागदपत्र सादर करण्यासाठी नोटीस बजावण्यात आल्या होत्या, मात्र बहुतेकांकडे सबळ कागदपत्रे नसल्याचे समोर आले आहे.

### सिडकोच्या सूचना

नुकताच लागू झालेल्या नोंदणी (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम २०२३ नुसार, सिडकोच्या जमिनीवर उभारण्यात आलेल्या अनधिकृत इमारतींतील सदनिका, दुकाने, कार्यालये यांची विक्री/हस्तांतरण दस्तांची नोंदणी करता येणार नसल्याचे सिडकोने स्पष्ट केले आहे. बेकायदेशीर दस्तांची नोंदणी केल्यास संबंधितांविरुद्ध फौजदारी कारवाई केली जाणार असून याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

> "परवानगीशिवाय बांधकाम करणाऱ्यांविरुद्ध महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ आणि भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत फौजदारी गुन्हे दाखल केले जाणार आहेत. तसेच संबंधितांवर अतिक्रमण, फसवणूक, सरकारी मालमत्तेचे नुकसान अशा कलमांखाली कायदेशीर कारवाई केली जाईल. अनधिकृत बांधकाम निष्कासनानंतर होणाऱ्या आर्थिक नुकसानीसाठी बांधकामधारक जबाबदार असतील."
>
> **सुरेश मेंगडे, मुख्य दक्षता अधिकारी, सिडको**

# आरोपींची पोलिस व्हॅनमध्ये पोलिसांवरच दादागिरी

**■कल्याण । प्रतिनिधी,**

कल्याण कोर्ट परिसरात उभ्या असलेल्या पोलिसांच्या गाडीत पोलिसांनाच मारहाण करण्यात आल्याची घटना घडली आहे. या घटनेने आरोपींना पोलिसांची आणि कोटार्ची कोणाचीच भीती राहिलेली नाही का, असा सवाल उपस्थित होत आहे. पोलिसांना मारहाण प्रकरणी चौघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



कल्याण न्यायालयात परिसरात गुरुवारी वेगवेगळ्या गुन्ह्यातील आरोपींना न्यायालयात हजर करण्यासाठी आणण्यात आले. या कैद्यांच्यासोबत मध्यवर्ती कारागृहाचे पोलीस होते. पोलीस आरोपींना कल्याण न्यायालयात हजर करण्यासाठी आले असता दुपारी १.४५ वाजण्याच्या सुमारास पोलीस आणि कैद्यांमध्ये वाद झाला. न्यायालयाच्या पार्किंगमधील सरकारी पोलीस वाहन क्रमांक एमएच १२ क्यूएक्स् ६८५५ या पोलीस व्हॅनमध्ये आरोपी आणि पोलीस बसलेले होते. त्या वाहनातील आरोपी आकाश वाल्मीकी, गणेश उर्फ शालु मरोठीया, योगींदर उर्फ भोलू मरोठीया, विवेक यादव (सध्या सर्व रा. आधारवाडी जेल, कल्याण प.) यांना जागा नसल्याने, ह्यतुम्ही सर्वजण पाठीमागे जावून बसून घ्याह्न असे पोलीस नाईक किशोर पेटारे यांनी सांगितले.

पोलीस नाईक पेटारे यांनी कैदांना मागे जाऊन बसा सांगितल्यामुळे कैदी रागावले आणि त्यांनी पोलिसांना धक्काबुक्की सुरु केली. वदीर्तील पोलिसांच्या अंगावर हात टाकला. त्यांची कॉलरपकडून त्यांना आरोपी दमदाटी करु लागले. आरोपींनी पोलिसांना चापटा, बुक्के मारायला सुरुवात केली. किशोर पेटारे यांच्यावर ठोश्याबुक्क्यांनी मारा करण्यात आला.

तेवढ्यात आरोपी आकाश वाल्मिकी याने पोलीस नाईक किशोर पेटारे यांच्या उजव्या कानावर बियाणींने भरलेली पिशवी मारली. यामुळे त्यांच्या कानाला दुखापत झाली आहे. आरोपींकडून पेटारे यांना शिवीगाळ आणि मारहाण होत असताना तिथे इतरही पोलीस कर्मचारी होते, त्यांच्याकडून आरोपींना रोखण्यात का आले नाही, असाही सवाल आता उपस्थित होत आहे.

पोलिसांच्या कामात अडथळा आणि त्यांना कर्तव्यापासून परावृत्त करण्यासाठी हल्ला करण्यात आला. किशोर पेटारे यांच्या तक्रारीवरुन कैद्यांविरुद्ध महात्मा फुले चौक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. या गुन्ह्याचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक विनोद पाटील हे करीत आहेत.

## झोपेतच सर्पदंश! ३ वर्षांच्या चिमुकलीसह मावशीचा मृत्यू

# केडीएमसी रुग्णालयावर निष्काळजीपणाचा आरोप

**■डोंबिवली । प्रतिनिधी,**


डोंबिवलीतील खंबाळपाडा परिसरात सोमवारी (दि. २९) मध्यरात्री हृदयद्रावक घटना घडली. ३ वर्षांची चिमुकली प्राणवी भोईर आणि तिची अवघ्या २४ वर्षांची मावशी श्रुती ठाकूर या दोघींचा सर्पदंशाने दुर्दैवी मृत्यू झाला. नातेवाइकांनी या प्रकरणी केडीएमसी रुग्णालय प्रशासनाने हलगर्जीपणा केल्याचा आरोप केला आहे.

### रात्रीच्या झोपेत काळाने घातला घाला

आजदे गावातील विक्की भोईर यांची पत्नी चिमुकल्या प्राणवीसोबत माहेरी गेली होती. रात्री प्राणवी ही मावशी श्रुतीसोबत झोपली होती. झोपेतच तिला अचानक साप चावला. प्राणवी जोरजोराने रडू लागली, मात्र नेमकं काय झालं हे सुरुवातीला कुणालाच कळलं नाही. काही क्षणांतच त्याच सापाने श्रुतीलाही दंश केला. तेव्हा दोघींनाही सर्पदंश झाल्याचं स्पष्ट झालं.

### श्रुतीचं पुढील महिन्यात होतं लग्न

कुटुंबीयांनी तत्काळ दोघींना केडीएमसीच्या शास्त्रीनगर रुग्णालयात दाखल केलं.



डॉक्टरांनी सुरुवातीला त्यांची प्रकृती स्थिर असल्याचं सांगितलं. पण, काही तासांतच प्राणवीची तब्येत अचानक बिघडली. पुढील उपचारासाठी तिला ठाण्याच्या सिव्हिल रुग्णालयात हलवण्यात आलं, मात्र तिथेच तिचा मृत्यू झाला. दरम्यान, श्रुतीला एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आलं. अँटी-स्नेक व्हेनम देऊनही उपचारादरम्यान तिची प्राणज्योत मालवली. श्रुतीचं पुढील महिन्यात लग्न होणार होतं, त्यामुळे या मृत्यूमुळे तिच्या कुटुंबावर शोककळा पसरली आहे.

या प्रकरणावर प्रतिक्रिया देताना डॉ. शुक्ल म्हणाल्या, दोन्ही रुग्णांवर आवश्यक उपचार करण्यात आले. अँटी-व्हेनम इंजेक्शन दिलं होतं. मात्र, प्रकृती गंभीर झाल्याने प्राणवीला ठाण्यात हलवण्यात आलं. नातेवाईकांच्या आरोपांची चौकशी केली जाईल आणि आवश्यक ती कारवाई केली जाईल.

अवघ्या तीन वर्षांची चिमुकली आणि विवाहाच्या उंबरठ्यावर असलेली तरुणी अशा दोन जिवांचा सर्पदंशामुळे घेतलेला बळी डोंबिवलीकरांसाठी मोठा धक्का ठरला आहे. खंबाळपाडा परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

> या दुहेरी मृत्यूला नातेवाईक आणि स्थानिकांनी ङऊटउ रुग्णालय प्रशासनाला जबाबदार ठरवले आहे. त्यांनी वेळेत अँटी-स्नेक डोस देण्यात उशीर केला, प्राथमिक उपचारांमध्ये हलगर्जीपणा केला आणि आवश्यक सुविधा नसल्यामुळेच दोन जीव गमावले असे आरोप केले आहेत. संतप्त नागरिक आणि नातेवाईकांनी थेट मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. दीपा शुक्ल यांच्या दालनात ठिय्या आंदोलन सुरू केले आणि जबाबदार डॉक्टरांवर कारवाईची मागणी केली.

# पोलिसांची बीट चौकीच अनधिकृत? रहिवाशी आक्रमक

**■विरार। प्रतिनिधी:**

वसई पूर्वेच्या एव्हरशाईन सिटी येथील ओमकार को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटीच्या आवारातच अतिक्रमण करण्यात आले आहे. हे अतिक्रमण कुणी भूमाफियांनी नाही तर चक्क पोलिसांनी केले आहे. या सोसायटीच्या मालकी जागेवर आचोळे पोलीस नवीन बीट चौकी बनवत आहेत. या बीट चौकीला रहिवाशांनी जोरदार विरोध केला आहे. नालासोपारा पश्चिम येथे नालासोपारा पोलीस ठाणे होते. वसई पूर्वेच्या वसंत नगरी, एव्हरशाईन सिटी हा परिसर या नालासोपारा पोलीस ठाण्याच्या अखत्यारित येतो. मोठा परिसर असल्याने लोकांच्या दैनंदिन तक्रारीच्या निवारणासाठी नालासोपारा पोलिसांनी एव्हरशाईन येथे एक बीट चौकी उभारली होती. स्थानिकांनी तात्पुरती चौकी बांधायला संमती दिली होती. त्यानंतर तुळींज ठाणे आचोळे पोलीस ठाण्याची निर्मिती झाली. मात्र तरीही ही चौकी कायम ठेवण्यात आली होती. दरम्यान, या पावसाळ्यात पावसाचे पाणी चौकीत शिरले आणि अनेक महत्त्वाची कागदपत्रे भिजली. त्यामुळेच पोलिसांनी बीट चौकीचा विस्तार करण्याचा निर्णय घेतला.

या नव्या एव्हरशाईन बीट पोलीस चौकीचे बांधकाम पोलिसांनी ओमकार को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटीच्या आवारात करायला घेतले. त्यासाठी कुठलीही परवानगी घेण्यात आलेली नव्हती. लोकांचा या बीट चौकीला विरोध आहे. मात्र रहिवाशांच्या विरोधाची पर्वा न करता रात्रीच्या अंधारात पोलीस संरक्षणाखाली नव्या बीट चौकीचे काम केले असल्याचा आरोप केला जात आहे. थेट सोसायटीच्या आवारातच बीट चौकी बांधली जात असल्याने रहिवाशांची खासगी आयुष्य धोक्यात आले आहे. या परिसरात असलेल्या दुकानांसमोरच




चौकी बनविण्यात येत आहे. त्यामुळे दुकानाचा दर्शनी भाग झाकला गेला आहे. त्याचा परिणाम त्यांच्या व्यवसायावर होण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे.

### रहिवाशी संतप्त

पूर्वी या परिसरात पोलीस ठाणे नव्हते आणि सोसायटीनेच पोलिसांना ही बीट चौकी काही दिवसांसाठी बांधण्यास दिली होती. मात्र आता गरज नसताना आमच्या जागेवर अतिक्रमण केले जात असल्याचा आरोप स्थानिक रहिवाशांनी केला आहे. रात्री १२ ते पहाटे ५ वाजेपर्यंत अंधारात पोलीस संरक्षणाखाली बांधकाम करत आहेत. ही पद्धत भूमाफियांची आठवण करून देणारी असल्याचा आरोप रहिवाशांनी केला आहे. कायद्याचे रक्षणकर्तेच नियम मोडत आहेत, असेही स्थानिकांनी सांगितले.

### पालिका आणि लोकप्रतिनिधींकडे तक्रार

सोसायटीच्या सभासदांनी या अनधिकृत बांधकामाविरोधात पोलीस आयुक्त, महापालिका आयुक्त तसेच स्थानिक आमदार स्नेहा दुबे पंडीत यांच्याकडे तक्रार दाखल केली असून तातडीने कारवाईची मागणी केली आहे. आमदार स्नेहा दुबे पंडित यांनी याबाबत मुख्यमंत्र्यांशी चर्चा करणार असल्याचे आश्वासन दिले आहे.

# आधी तरूणीला चापट मारली, नंतर लाथा मारल्या मग... पुण्यात भररस्त्यात मुलाचा राडा

**■पुणे। प्रतिनिधी:**

पुण्यात गोळीबार, कोयते फिरवणे आणि मारहाण, अशा घटना सातत्याने घडत आहेत. पोलिसांचे कुठलेही 'भय' गुंडांना राहिले नसल्याचे दिसून येत आहे. अशातच एका तरूणीला भररस्त्यात जबरदस्त मारहाण केल्याचं समोर आलं आहे. याचा व्हिडीओ सोशल मीडियात व्हायरल होत आहे.

पुण्यातील एका भागात एक मुलगा तरूणीला लाथाबुक्क्यांनी मारहाण करत आहे. परंतु, कुणीही तरूणाला अडविण्याचा प्रयत्न करत नाही. कोणत्या कारणाने मुलगा तरूणीला मारहाण करतोय? हे समोर आलं नाही. परंतु मारहाणीचा व्हिडीओ समोर आल्यानंतर एकच संताप व्यक्त केला जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मंगळवारी (३० सप्टेंबर)



रात्री ८ वाजण्याच्या सुमारास पुणे-सातारा रोडवर असलेल्या के. के. मार्केट ते चव्हाण नगरला जाणाऱ्या मार्गावर ही घटना घडली आहे. व्हिडीओत सुरूवातीला दोन मुले आणि एक तरूणी दिसत आहे. त्यातील एक मुलगा दुसऱ्या तरूणाला मारहाण करताना दिसत आहे. यातील एक तरूण तिथून पळून जातो. नंतर संबंधित तरूण आपला मोर्चा तरूणीकडे वळवतो.

मुलगा तरूणीच्या तोंडावर मारहाण करतो. तेवढ्यात तरूणी रिक्षात बसण्याचा प्रयत्न करते, तर मुलगा रिक्षावाल्याला तरूणीला 'खाली उतरव' म्हणून धमकी देतो. तरूणी खाली उतरल्यानंतर थोडे पुढे जाते थांबते, तर मुलगा येऊन तिला लाथ मारतो. हा सगळा प्रकार एका व्यक्तीने कॅमेऱ्यात कैद केला असून हा व्हिडीओ प्रचंड व्हायरल होत आहे. मारहाण करणारा मुलगा आणि मारहाण झालेली तरूणी कोण आहेत? कशामुळे हा प्रकार घडला? याबद्दल कुठलीही माहिती मिळू शकलेली नाही. ''याप्रकरणी कुठलीही तक्रार प्राप्त झाली नाही,'' अशी माहिती सहकार नगरचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विठ्ठल पवार यांनी दिली आहे.

# मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलिसांकडून ८ महिन्यांत ५६ कोटींचे ड्रग्स जप्त

**■भाईंदर। प्रतिनिधी:**

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलिसांकडून अंमली पदार्थ विक्री आणि सेवन कर्णार्यांवर कारवाई धडाका सुरु आहे. मागील आठ महिन्यांत ५६ कोटी ६८ लाख १२ हजार १० रुपयांचा ३३४ किलो अंमली पदाथार्चा साठा जप्त करण्यात आला आहे.नशा मुक्तचा निर्धार पोलिसांकडून करण्यात आला आहे.त्यासाठी पोलिसांकडून कारवाई सोबतच जनजागृती देखील करण्यात येत आहे. तरुण,युवा पिढी नशेच्या



आहारी जात असल्याचे प्रमाण वाढले आहे. मिरा-भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालय हद्दीत दररोज अमली पदाथार्चे सेवन व विक्री कर्णार्यांवर कारवाई सुरू आहे.या कारवाईमध्ये ८ महिन्यात २२९ आरोपींना अटक करण्यात आली आहे. तर १२५ गुन्हे विविध पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आले आहे.पोलिसांकडून सुरू असलेल्या कारवाईमुळे अंमली पदाथार्ची तस्करी कर्णार्यांचे धाबे दणाणले आहेत.

या कारवाईमध्ये मोठ्या प्रमाणात गांजा, एमडी, कोकेन, चरस, कोरेक्स कफ सिरपचा समावेश आहे. शहरातील बंद पडलेल्या कंपन्या, गोडावून, कारखाने आदी ठिकाणी पथकांनी नियमित तपासणी करावी. तसेच शेजारील राज्यातून अंमली पदार्थ आपल्या शहरात येणार नाहीत, याकडे लक्ष द्यावे, अशा सूचनाही पोलीस आयुक्त यांच्या कडून देण्यात आल्या आहेत.जनजागृतीकरता पोलिसांच्या मार्फत शहरात सणांच्या कालावधीत मंडळामध्ये जनजागृती कार्यक्रम आयोजित करून लोकांना जनजागृती करण्यात येते.तरुण पिढीमध्ये अंमली पदार्थ बाबत जागृकता यावी यासाठी शाळा,कॉलेजमध्ये कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. याच बरोबर अनेक वेळा पटनाट्याच्या माध्यमातून स्ट्रीट प्ले करून लोकांमध्ये जागरूकता पसरवण्याचे काम पोलिसाच्या मार्फत करण्यात येत आहे. मध्यवर्ती गुन्हे शाखेला तेलंगणामधील एमडी या ड्रग्सचा कारखाना उध्वस्त करण्यात यश आले. मिरा-भाईंदर, वसई -विरार पोलिसांनी केलेली ही कारवाई महाराष्ट्रातील ड्रग्स विरोधी सर्वात मोठी कारवाई आहे. या कारवाईत दहा पेक्षा अधिक आरोपींना बेड्या ठोकल्या.या कारवाईमध्ये पोलीस निरीक्षक प्रमोद बडाख यांची प्रमुख भूमिका होती.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००01४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com